www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ६० ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, बुधवार, १० जुलै २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात



### बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांची फी भरण्याच्या निर्णयाची २०१७ पासून अंमलबजावणी - उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

● मुंबई, दिगंबर जाधव :

बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या केवळ मुलींचीच नाही तर मुलांचीही १०० टक्के फी भरण्याबाबत शासनाने यापूर्वीच निर्णय घेतला आहे. त्यानुसार दि. ७ ऑक्टोबर, २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी सुरू असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानपरिषदेत निवेदनाद्वारे दिली. पान २ वर

### अनधिकृत पॅथॉलॉजी लॅबवर कारवाईसाठी लवकरच कायदा : मंत्री उदय सामंत

● मुंबई, दिगंबर जाधव :



मुंबई : अनधिकृत पॅथॉलॉजी लॅबवर नियंत्रण आणण्यासाठी राज्य शासन लवकरच कडक कायदा आणेल. यामध्ये विना नोंदणी लॅब सुरू असतील, तर त्यांना शिक्षेची तरतूद या कायद्यात असेल, अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत दिली. पान २ वर

### मुरबाडमध्ये कथोरेंची महायुतीतच कोंडी?

● ठाणे, विशाल पाटील :



लोकसभा निवडणुकीत भिवंडी लोकसभा मतदारसंघातील भाजपचे कपिल पाटील यांच्या पराभवानंतर या पट्ट्यातील राजकीय गणिते बिघडली आहेत. पाटील यांच्या विजयासाठी प्रयत्न न केल्याबद्दल मुरबाडचे भाजप आमदार किसन कथोरेंची पक्षातूनच कोंडी केली जात असताना बदलापूरमधील शिंदे गटाचे शहरप्रमुख वामन म्हात्रे मुरबाडच्या उमेदवारीवर दावा केल्याने कथोरे कात्रीत सापडले आहेत. पान २ वर

## प्रलंबित तसेच दाखलपूर्व प्रकरणे लोकअदालतीमध्ये सुनावणीसाठी ठेवा - न्या. ईश्वर सूर्यवंशी

### जिल्हा व तालुका न्यायालयांमध्ये २७ जुलै रोजी होणार राष्ट्रीय लोकअदालत

● ठाणे, यश सावंत :



प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. श्रीनिवास ब्रि. अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली दि.27 जुलै 2024 रोजी 'राष्ट्रीय लोकअदालत' चे आयोजन करण्यात आले आहे. न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली प्रकरणे आणि दाखल पूर्व प्रकरणे सुनावणीसाठी लोकअदालतीमध्ये ठेवता येतील. संबंधितांनी आपल्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी येत्या 27 जुलै, 2024 रोजी आयोजित केलेल्या लोकअदालतीमध्ये आपली प्रकरणे ठेवावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, न्या. ईश्वर कां. सूर्यवंशी यांनी केले आहे.

आपापसात तडजोड करण्याजोगी फौजदारी प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, वैवाहिक वाद, कामगारांचे वाद, भूसंपादन प्रकरणे, विद्युत आणि पाणी देयक बद्दलचे प्रकरणे, सेवा विषयक पगार, भत्ते व सेवा निवृत्तीचे फायदे-विषयक प्रकरणे, महसूल प्रकरणे, इतर दिवाणी प्रकरणे जसे भाडे, वहिवाटीचे हक्क, मनाई हुकमाचे दावे, विशिष्ट पूर्व बंध कराराची पूर्तता विषयक वाद आदी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे लोकअदालतीमध्ये ठेवता येणार असून त्याचप्रमाणे धनादेश अनादर प्रकरणे, बँकेचे कर्ज वसूली प्रकरणे, कामगारांचे वाद, कर वसुलीचे प्रकरणे, विद्युत आणि पाणी देयक या बद्दलची प्रकरणे आणि इतर आपसात तडजोड पात्र प्रकरणे, वैवाहिक व इतर दिवाणी वाद अशा प्रकारची दाखलपूर्व प्रकरणे या लोकअदालतमध्ये ठेवता येणार आहेत. पान २ वर

## वरळी हिट अँड रन प्रकरणातील मुख्य आरोपी मिहीर शाहाला अटक

मदत करणारे १२ जण ताब्यात



● मुंबई, विशाल कारंडे :

वरळी हिट अँड रन अपघात प्रकरणातील मुख्य आरोपी मिहीर शाहाला शहापूरमधून अटक करण्यात आलं आहे. या प्रकरणात मिहीर शाहाची आई आणि बहिणीलाही पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. तसेच या आरोपीला मदत करणाऱ्या 12 जणांनाही मुंबईच्या गुन्हे शाखेने ताब्यात घेतलं आहे. मिहीर शाहाने दारूच्या नशेत भरधाव वेगाने गाडी चालवून वरळीमधील अॅट्रिया मॉलजवळ कावेरी नाखवा या महिलेचा जीव घेतला होता. त्यानंतर तो फरार झाला. आता पोलिसांनी दोन दिवसांनंतर त्याला शहापूरमधून अटक केली आहे. मिहीर शाहाची वैद्यकीय चाचणी केली जाणार आहे.

## सापुताऱ्यात पर्यटकांची बस दरीत कोसळली, दोन मुलांचा मृत्यू



● नाशिक, सचिन कदम :

गुजरातमधील डांग जिल्ह्यातील सापुतारा घाटात रविवारी सायंकाळी पर्यटकांची खासगी बस दरीत कोसळून दोन मुलांचा मृत्यू झाला. एका मालवाहतूक वाहनापुढे जाण्याच्या नादात चालकाचे नियंत्रण सुटून बस कठडा तोडून दरीत गेली. या बसमध्ये सुमारे ७० प्रवासी होते. हे सर्व प्रवासी सुरत येथील रहिवासी असल्याचे सांगितले जाते. सापुतारा हे गुजरात राज्यातील आणि नाशिक जिल्ह्याच्या सीमेलगतचे पर्यटन स्थळ असल्याने दर शनिवार, रविवारी याठिकाणी मोठी गर्दी असते. सध्या पावसामुळे परिसरातील निसर्ग बहरला आहे. पान २ वर

## राज्यात १० नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्याचे प्रयत्न - वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

● मुंबई, विशाल कारंडे :



राज्यात १० नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्याचे शासनाचे प्रयत्न आहेत. मुंबई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास राष्ट्रीय वैद्यक परिषदेने ५० (एम.बी.बी.एस.) विद्यार्थी क्षमतेची परवानगी दिलेली आहे.उर्वरीत ९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे अर्ज राष्ट्रीय वैद्यक परिषदेमार्फत दर्शविण्यात आलेल्या त्रुटी पूर्ण करण्यात येणार असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री. मुश्रीफ यांनी सांगितले. मंत्री श्री.मुश्रीफ म्हणाले, की शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता जिल्हा गडचिरोली, जालना, वाशीम, हिंगोली, बुलढाणा, अमरावती, नाशिक, भंडारा, अंबरनाथ (जिल्हा ठाणे) आणि मुंबई (१० संस्था) येथे १०० (एम.बी.बी.एस.) विद्यार्थी क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याकरिता राष्ट्रीय वैद्यक परिषद, नवी दिल्ली यांना अर्ज सादर करण्यात आले होते.

त्रुटींची पूर्तता करण्याची कार्यवाही शासन व संचालनालयस्तरावर सुरु आहे. अध्यापकांची पदे भरण्याची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे सुरु असून वैद्यकीय महाविद्यालयाची इमारत आणि संलग्नित रुग्णालय या संदर्भातील कार्यवाही पूर्ण झालेली आहे. पान २ वर

## विधान परिषद निवडणुकीत मराठा आमदार ओबीसीं उमेदवारांना मतदान करतील ?



● नागपूर, नितीन देवळेकर :

आरक्षणाच्या मुद्यावरून राज्यात मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष पेटला आहे. सत्ताधाऱ्यांमधील एक प्रबळ गट मराठ्यांच्याबाजूने तर दुसरा गट ओबीसींच्याबाजूने असल्याचे दिसून आले आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मराठा कार्ड चालले व त्याचा फटका महायुतीच्या उमेदवारांना बसला. १२ जुलैला विधान परिषदेच्या ११ जागांसाठी निवडणुका आहेत व भाजपने यात ओबीसी कार्ड खेळले आहे. त्यामुळे सर्वच पक्षातील मराठा आमदार कोणती खेळी खेळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे .विधान परिषदेच्या ११ जागांसाठी १२ उमेदवार रिंगणात असल्याने यात घोडेबाजार होणे अटळ आहे. विधानसभा सदस्य या निवडणुकीत मतदान करतात. राज्यात विधानसभेचे एकूण २८८ सदस्य आहेत. पान २ वर

## महाराष्ट्रात प्रचाराचे झंझावाती दौरे सुरु करणार असल्याने श्री सिध्दीविनायकाचे दर्शन - अजित पवार

■ श्री सिध्दीविनायकाच्या दर्शनाने राष्ट्रवादी कॉंग्रेसने फोडला विधानसभा प्रचाराचा नारळ
■ अजितदादा पवारांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीची ताकद मुंबईत अवतरली



● मुंबई, दिगंबर जाधव :

महाराष्ट्रात राष्ट्रवादी कॉंग्रेस अधिक मजबूत करण्यासाठी आणि येत्या काही दिवसात महाराष्ट्रात प्रचाराचे झंझावाती दौरे सुरु करणार असल्याने त्याची सुरुवात म्हणून आज माझ्या सर्व मंत्री आमदार आणि पदाधिकाऱ्यांसमवेत श्री सिध्दीविनायकाचे दर्शन घेतल्याची माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली. सोमवारी पक्षाच्या बैठकीत निर्णय झाल्यानंतर आज सकाळी अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे खासदार, आमदार, मंत्री व पदाधिकारी पक्ष कार्यालयात एकत्र जमून बसने श्री सिध्दीविनायकाच्या दर्शनाला दाखल झाले. पान २ वर

## पावसाळ्यात बुधवार व गुरुवार सिडकोवासियांचा पाणी पुरवठा बंद राहणार

● पनवेल, भावना जैन :



सिडको वसाहतींमध्ये घर खरेदी केलेले घरमालक सध्या पावसाळयातील अतिवृष्टीमुळे पुरसदृष्यस्थितीला सामोरे करत आहेत. त्याचसोबत या घरमालकांना बुधवार सकाळपासून ते गुरुवार सकाळपर्यंत पाणी पुरवठा बंद राहणार असल्याने पाणी संकटाला सामोरे जावे लागणार आहे. सिडको मंडळाने कळंबोली, काळुंद्रे, करंजाडे आणि नवीन पनवेल या वसाहतींमध्ये पाणी पुरवठा बुधवार ते गुरुवारपर्यंत बंद राहणार असून नागरिकांनी काटकसरीने पाणी वापरण्याचा सल्ला नागरिकांना दिला आहे. महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडून (मजीप्र) सिडको मंडळाला पाणी मिळाल्यानंतर सिडको वसाहतींना पाणी पुरवठा केला जातो. सिडको मंडळाने संकेतस्थळावरुन नागरिकांना केलेल्या आवाहनामध्ये भोकरपाडा येथील जलशुद्धीकरण केंद्रातील दुरुस्तीच्या कामामुळे तसेच वायाळ येथील दुरुस्तीच्या कामामुळे हा पाणी पुरवठा होणार नसून गुरुवारी कमी दाबाने पाणी पुरवठा सूरु झाल्यानंतर शुक्रवारी (ता.१२) पाणी पुरवठा पुर्ववत होण्यासाठी लागू शकेल असे सुद्धा घोषणापत्रात कळविले आहे.

## जिथे गवताच्या पात्याला भाले फुटतात तेथे शिवसेनेचा पराभव कसा होवू शकतो!

### छत्रपति संभाजीनगर येथून, शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे

● छत्रपती संभाजीनगर, नितीन देवळेकर :



छत्रपती संभाजीनगर येथे शिवसेना संकल्प मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात ,उद्धवसाहेब यांनी भाजप व शिंदे टोळीचा खरपुस समाचार घेतला. ज्या सरकार जवळ शेतकरी बांधवाना कर्ज माफ करण्यासाठी पैसे नाही,जुनी पेंशन योजना लागू करण्यासाठी पैसे नाही, नवीन नौकर भर्ती साठी पैसे नाहीत,श्रावणबाळ योजना व संजय गांधी निराधार योजना चे पैसे वेळेवर मिळत नाही .सरकारच्या तिजोरीत पैसा अडका नाही, महाराष्ट्र सरकार वर लाखो करोडो रुपयीचं ,जागतीक बँकेचे कर्ज आहे व नवीन लाडकी बहिण ही योजना राबविण्यासाठी,सरकारी तिजोरीत एक दमडी शिल्लक नसतांना ,केवळ विधानसभा निवडणुकीत मते मिळवण्यासाठी सरकार 1500 दर महिन्याला देणार अशी थाप मारत आहे. निवडून आल्यानंतर हे सरकार काहीच देणार नाही कारण मोदी यांनी तर प्रत्येक खात्यात पंधरा पंधरा लाख टाकु असे महटले होते पण निवडूनआल्यानंतर ते पंधरा लाख अजून येत आहे.जशी मोदीसाहेब यांनी पधरा लाखाची थाप मारून मते मिळवली तसेच एकनाथ शिंदे हे फक्त पंधराशे रूपयाची थाप मारून पून्हा मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न पहात आहेत.


निवडून आल्यानंतर मोदी ने पंधरा लाख दिले का नाही मग मी आता उद्धवसाहेब यांना धोका देवून व इतरांना फसवणारया फडणवीस यांना फसवुन मुख्यमंत्री झालो तिथे 1500रुपयाची लालुस दाखवून ,महाराष्ट्राची फसवणूक करून मुख्यमंत्री झालो तर काय बिघाडणार आहे,असं एकनाथ शिंदे यांना वाटत आहे. मोदींना कोणी पंधरा लाखाची थाप का मारली ,असं कोणी विचारतोय का ! वरील भावना उद्धवसाहेब यांनी बोलावून दाखवल्या.नागरिकांना सावध केले आता किती नागरिक सावध झाले व किती नागरिक बेसावध असल्याने एकनाथ शिंदे यांचे सावज होतील हे विधानसभा निवडणूकीचा निकाल हाती आल्यानंतर च कळेल. थोडक्यात पंधरा लाखाचा प्रवास पंधराशे रुपयावर आला तरी अंधभक्त व विकावु मतदार मोदी मोदी करत एकनाथ शिंदे यांना पाठिंबा देत आहे ,ही गोष्ट समजण्या पलीकडील आहे.

पानिपतच्या लढाईची आठवण उद्धवसाहेब यांनी संभाजीनगर च्या सभेत करून दिली. जे मराठे जातीपातीत विभागल्या मुळे ,जेवायला एकत्र येवू शकत नाही ते मराठे लढताना एकी ने लढलेच नाही व पानिपत च्या लढाईत दारूण पराभव होवुन अब्दालीच्या हातून मरण पावले. पान २ वर

## भारतात आणली जाणारी वाघ नखे छत्रपती शिवाजी महाराजांची नाहीत - इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत

● मुंबई, विशाल कारंडे :

छत्रपती शिवरायांची वाघनखं भारतात येणार अशी घोषणा राज्य सरकारने केली. ही वाघनखं याचि देही, याची डोळा पाहता येतील, म्हणून प्रत्येकजण आनंदून गेला होता, मात्र या वाघनखांवर एक मोठा दावा केला गेला आहे. लंडनच्या व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियम लंडन येथून भारतात आणली जाणारी वाघ नखे छत्रपती शिवाजी महाराजांची नाहीत, असा दावा इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांनी केला आहे. ज्यामुळे अनेक प्रश्नचिन्ह उभी राहिलीत. यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मी काही इतिहासाचा जाणकार नाही, मात्र यातील जाणकारांचं मत एकदम दुर्लक्षित करू नये, असे वक्तव्य शरद पवारांनी केली आहे. शरद पवार म्हणाले, इंद्रजीत सावंत यांच्या इतिहासातील कामाची मला



कल्पना आहे. इतिहासामध्ये त्यांचा अभ्यास आहे योगदान आहे . मी काही इतिहासाचा जाणकार नाही. मात्र यातील जाणकारांचं मत एकदम दुर्लक्षित करू नये. वाघनखांवरून ज्येष्ठ इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांनी मोठा दावा केला आहे. लंडनमध्ये असलेली वाघनखं ही शिवरायांची नसल्याचा दावाच सावंत यांनी केलाय.भारतात आणली जाणारी वाघनखं शिवरायांची नाहीत. लंडनच्या संग्रहालयाने पत्र पाठवून माहिती दिली. शिवरायांची वाघनखं साताऱ्यातून बाहेर गेलीच नाहीत.

### महाराष्ट्राची फसवणूक असून शिवाजी महाराजांचा अपमान : इंद्रजीत सावंत

व्हिक्टोरिया अल्बर्ट म्युझिअमने असे सांगितले असताना महाराष्ट्राचे मंत्री धादंत खोटे बोलत आहे. जी गोष्टी छत्रपती महाराजांची नाही ती गोष्ट महाराजांची आहे असे सांगत, त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करत आहे. 30 कोटींचा खर्च करत फक्त तीन वर्षासाठी असणार आहे.तसेच वाघनखांसाठी जे संग्रहालय तयार करण्यात येत आहे, त्यासाठी आठ कोटी खर्च करण्यात येत आहे. त्याचे टेंडर देखील महाराष्ट्राबाहेरील कंपनीला देण्यात आले आहे.

## संपादकीय

# जनगणना हवीच

करोनाच्या महासाथीमुळे २०२१ ची दशवार्षिक जनगणना होऊ शकली नाही. त्यानंतर लोकसभा निवडणुका आल्या. गेल्या १४ वर्षांमध्ये समाजात झालेले बदल समजून घेण्यासाठी, पुढील धोरणे ठरवण्यासाठी आता तरी जनगणना होणे अत्यावश्यक आहे. भारताची लोकसंख्या हा जगासाठी उत्सुकतेचा विषय आहे. आपल्यालाही या आकड्याविषयी कुतूहल असते. निरनिराळी प्रारूपे लावून लोकसंख्येचा अंदाज करणे अगदीच अशक्य नसते; त्यानुसार भारताची आजची लोकसंख्या १४३ कोटींपेक्षा थोडी जास्त आहे. मात्र हा खरा आकडा नाही, तर ते अनुमान आहे. तो पाहून जरा कमी किंवा जास्तही असू शकतो. २०११ नंतर १० वर्षांनी येणारी २०२१ ची जनगणना कोविडमुळे घेता आली नाही. परंतु कोविडचा जोर ओसरला आणि आपले सामान्य जीवन सुरू होऊ लागले तेव्हा जनगणनेची आठवण व्हायला लागली. कोविड काळात मोठ्या प्रमाणात झालेल्या मृत्यूंची संख्या आणि भीतीही लोकांच्या मनात होती. कोविडमुळे खरंच किती माणसे दगावली, कुठे याचा फटका जास्त बसला याचा संबंध तपासण्यासाठीही लोकसंख्येचे आकडे मिळायला हवे असे वाटत होते. याखेरीज अध्यापक - संशोधक, सामाजिक संस्था आणि त्यांचे कार्यकर्ते हेही त्यांच्या अभ्यासासाठी किंवा कामाच्या नियोजनासाठी लोकसंख्येची माहिती मिळविण्यास उत्सुक होते; परंतु जनगणनेची शक्यता दिसत नव्हती. २०२२ आणि २०२३ साल असेच वाट बघण्यात गेले. २०२४ मध्ये सार्वत्रिक निवडणुका असल्यामुळे त्यावर्षी जनगणना होऊ शकणार नाही याची कल्पना होतीच. आता पुढे काय ? जनगणना होणार का आणि झाली तरी केव्हा होणार याविषयीची घोषणा कधी होते याची उत्सुकता मात्र आहे. जनगणनेविषयी थोडेसे. शास्त्रीय भाषेत सांगायचे झाले तर जनगणना म्हणजे एका ठरावीक काळात संपूर्ण देशातील किंवा एखाद्या विशिष्ट प्रदेशातील सर्व लोकांची सामाजिक, आर्थिक व लोकसांख्यिकीय माहिती एका विशिष्ट स्वरूपात संकलित करणे, त्याचे विश्लेषण करणे आणि ती सर्व माहिती एकत्रितपणे प्रकाशित करणे. त्यामुळे संपूर्ण देशातील सर्व व्यक्तींची कोण व किती; ते काय करतात; कोणत्या प्रकारच्या घरात राहतात त्यांच्याकडे काय प्रकारच्या घरगुती सुविधा, सोयी आणि आवश्यक गोष्टी आहेत याबरोबरच त्या घरातील सर्वांची वैयक्तिक माहितीही मिळते. माहितीतील महत्त्वाच्या बाबी म्हणजे लोकसंख्येचा आकडा, त्यातील वाढ आणि वाढीचा दर, राहण्याचे ठिकाण ग्रामीण, शहरी, झोपडवस्ती इत्यादी. वय, लिंग, वैवाहिक स्थिती, साक्षरता, शिक्षण व्यवसाय उद्योग, स्थलांतर, धर्म, मातृभाषा, अपंगत्व इत्यादी.

यातील बहुतांश माहिती फक्त देशापुरतीच नव्हे तर राज्य, जिल्हा, तालुका, गाव, शहरी विभाग (वॉर्ड) इथपर्यंत उपलब्ध असते. २०११च्या जनगणनेनुसार देशात ३५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश ६४० जिल्हे, ५,९६१ तालुके, ८,००१ शहरे आणि ६४०८५२ गावे येथपर्यंत माहिती उपलब्ध आहे. हे आकडे जनगणनेची व्याप्ती आणि त्याबरोबरच महत्त्व समजण्यासाठी आवश्यक आहेत. लोकसंख्येची माहिती सर्वांना हवी याविषयी दुमत नाही. ती फक्त अभ्यासासाठी आणि कार्यकर्त्यांसाठी आवश्यक आहे असे नाही तर धोरणकर्त्यांसाठी ती अधिकच महत्त्वाची आहे. कोणतीही धोरणे आखताना योजनांची अंमलबजावणी करताना, आपण हे नेमके कोणासाठी करतो आहे याचा सरकारलाही नक्की अंदाज हवा. किती व्यक्तींना / स्त्रियांना मुलांना योजनांचा फायदा मिळू शकतो हे निश्चितपणे कळणे अतिशय गरजेचे असते. अनुमानित लोकसंख्या अशा वेगवेगळ्या गटात जनगणनेशिवाय इतर कुठूनही मिळू शकत नाही. जनगणनेत लोकसंख्येच्या आकड्याव्यतिरिक्त वैयक्तिक आणि घराच्या संदर्भातील अनेक बाबींची माहिती असते. जनगणनेखेरीज त्या सगळ्यांचे अंदाज बांधणे अतिशय आव्हानात्मक आहे किंवा काही वेळा तर अशक्यही आहे. जन्म, मृत्यू आणि स्थलांतराचा परिणाम जसा लोकसंख्येच्या आकड्यावर होतो तसाच वय आणि लिंग यांच्या वर्गीकरणावरही होतो. या तीन घटकांच्या एकत्रित परिणामामुळेच विविध वयोगटात असणाऱ्यांचे प्रमाण कमी जास्त होते. धोरणे ठरवताना किंवा योजना आखताना त्याविषयीचे आकडे उपलब्ध असणे गरजेचे आहे. मुलांच्या, प्रौढांच्या आणि ज्येष्ठ नागरिकांच्या गरजा निराळ्या असतात.



## आजची चित्रोळी

बहुमत मिळविण्यासाठीं
उपाय आहे अगदीं सोपा !
लेकरांनी भरून जाऊं द्या
तुमच्या घराचा सोपा !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांची फी भरण्याच्या...

महाराष्ट्र शासनाने राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या ज्या मुलींच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न आठ लाखांपेक्षा कमी आहे, अशा सर्व मुलींची १०० टक्के फी शासन भरेल, अशी घोषणा करून त्याची अंमलबजावणी होण्याबाबत अर्थसंकल्पीय भाषणात घोषणा केली. त्यानुसार मंत्रीमंडळाच्या बैठकीत रितसर मान्यता घेऊन शासन निर्णय निर्गमित केला. व्यावसायिक अभ्यासक्रमांची मुलींची १०० टक्के फी सरकार भरेल, यावर अनेकांनी आनंद व्यक्त करताना बिगर व्यावसायिक (Non Professional) अभ्यासक्रमांचीही (कला, वाणिज्य, विज्ञान इ.) १०० टक्के फी शासनाने भरावी, असा मुद्दा उपस्थित केला. त्या अनुषंगाने मंत्री श्री.पाटील यांनी स्पष्टीकरण केले.

राज्यात मुलींचे व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेशाचे प्रमाण एकूण विद्यार्थी लोकसंख्येमध्ये ३६ टक्के असून प्रगतीशील राज्यामध्ये हे प्रमाण वाढण्याची आवश्यकता विचारात घेऊन मुलींची शिक्षण फी १०० टक्के माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### अनधिकृत पॅथॉलॉजी लॅबवर कारवाईसाठी लवकरच कायदा...

जिल्हास्तरावर बोगस डॉक्टर शोध मोहिमेप्रमाणेच बोगस लॅब शोध मोहीम हाती घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

सदस्य सुनील राणे यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता.

मंत्री श्री. सामंत म्हणाले की, राज्यात महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिलकडून सन २०१९ पासून आतापर्यंत ७ हजार ८५ उमेदवारांनी प्रमाणपत्र घेतली आहेत. मुंबईमध्ये सध्या १९७ हॉस्पिटलशी संलग्न ठिकाणी लॅब आहेत. मात्र, लॅब सुरू करण्याची आवश्यक परवानगी नसताना ज्या ठिकाणी अनधिकृत लॅब सुरू असेल, त्या बंद करण्यात येतील. यासंदर्भात राज्य शासन लवकरच नवा कायदा आणत असल्याचेही त्यांनी सांगितले.

सध्या राज्यभरात भरारी पथक नेमून अशा बोगस लॅब शोधण्याची कार्यवाही केली जाईल. नगरविकास, सार्वजनिक आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षण विभागाशी निगडित विषय यामध्ये आहेत. त्यामुळे या विभागांची एकत्रित बैठक घेण्यात येईल. कायद्याचा मसुदा तयार आहे. याबाबत अधिकच्या सूचना घेऊन कडक कायदा आणण्यात येईल, अशी माहितीही मंत्री श्री. सामंत यांनी दिली.

यावेळी सदस्य अजय चौधरी, आशिष शेलार, राजेश टोपे, प्रकाश आबिटकर, योगेश सागर, नाना पटोले यांनी चर्चेत सहभाग घेतला.

### मुरबाडमध्ये कथोरेंची महायुतीतच कोंडी?...

लोकसभा निवडणुकीत भिवंडी लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गटाचे सुरेश म्हात्रे निवडून आले. या विजयामध्ये मुरबाडचे भाजपचे आमदार किसन कथोरे यांचा मोठा प्रभाव असल्याची प्रतिक्रिया खुद्द कपिल पाटील यांनीच दिली होती. त्यामुळे कपिल पाटील विरुद्ध किसन कथोरे यांचा अंतर्गत संघर्ष पुन्हा उफाळून आला होता. कथोरे यांच्या समर्थकांनीही सुरेश म्हात्रे यांच्या विजयाचे संदेश समाजमाध्यमांवरून प्रसारित करताना त्याचे श्रेय कथोरे यांना दिले होते. त्यामुळे हा अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला. आता भाजपमध्ये पक्षांतर्गत संघर्ष तीव्र झाला असून कपिल पाटील यांच्या समर्थकांनीही कथोरेंच्या कोंडीसाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

नुकत्याच पार पडलेल्या कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत भाजपचे निरंजन डावखरे यांचा चांगल्या मताधिक्याने विजय झाला. मात्र या निमित्ताने मुरबाड मतदारसंघात शिवसेना आणि भाजपात कुरबुरी पहायला मिळाल्या. त्यातच शिवसेनेचे बदलापूर शहर प्रमुख वामन म्हात्रे यांनी मुरबाड मतदारसंघात शिवसेनेची ताकद अधिक आहे असे वक्तव्य करून मुरबाड मतदारसंघावर दावा सांगितला. यामुळे कथोरे यांची दुहेरी कोंडी झाल्याचे दिसून येत आहे. आपल्या प्रभावामुळे मागील निवडणुकीत कथोरेंचा विजय सोपा झाल्याचा दावाही म्हात्रे यांनी केला. वामन म्हात्रे यांनी उमेदवारीसाठी दावा केल्यास कथोरेंना भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांकडूनही विरोध होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, कथोरे समर्थकांना आपल्या नेत्याच्या उमेदवारीबाबत खात्री आहे. वामन म्हात्रे यांनी याआधीही कथोरे यांच्याविरोधात निवडणूक लढवली होती. मात्र त्यामुळे कथोरेंचा विजय सोपा झाल्याचे कथोरेंचे समर्थक सांगत आहेत.

### प्रलंबित तसेच दाखलपूर्व प्रकरणे लोकअदालतीमध्ये...

न्या. ईश्वर कां. सूर्यवंषी म्हणाले की, लोकअदालतीच्या निवाड्याविरुध्द अपील नाही, एकाच निर्णयात कोर्टबाजीतून कायमची सुटका होते, खटल्यांमध्ये साक्षी पुरावा, उलटतपासणी, दीर्घ युक्तीवाद या बाबी टाळल्या जातात. निकाल झटपट लागतो. लोकअदालतीत होणारा निवाडा हा आपआपसात समजुतीने होत असल्याने कुणाची हार वा जीत होत नाही. लोकअदालतीचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो, परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकांतील द्वेष वाढत नाही व कटुताही निर्माण होत नाही. कोर्टाच्या हुकूमनाम्याप्रमाणे लोकअदालतीत होणाऱ्या निवाड्याची अंमलबजावणी कोर्टामार्फत करता येते. वेळ, पैसा यांची बचत होते, इतकेच नव्हे तर लोकअदालतीत निकाली निघणाऱ्या प्रकरणांमध्ये कायद्यानुसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते. लोकअदालतचे महत्व लक्षात आल्याने 2023 साली झालेल्या राष्ट्रीय लोकअदालत मध्ये ठाणे जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून राष्ट्रीय लोकअदालतचा लाभ अनेक पक्षकारांना मिळाला आहे.

तरी आपली प्रलंबित तसेच दाखल व्हावयाचे आहेत अशी प्रकरणे लोकअदालतीमध्ये सुनावणीसाठी ठेवण्याकरिता संबंधित न्यायालयातील तालुका विधी सेवा समिती अथवा जिल्हा विधी सेवा समिती प्राधिकरण यांच्या कार्यालयांशी संपर्क साधावा आणि लोकअदालतीमध्ये सहभागी होऊन आपले वाद सामोपचाराने कायमचे मिटवावेत, असे आवाहन न्या. ईश्वर सूर्यवंशी यांनी केले आहे.

### सापुताऱ्यात पर्यटकांची बस दरीत कोसळली, दोन मुलांचा मृत्यू...

त्यामुळे पर्यटकांची अधिक गर्दी होत आहे. रविवारी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास सुरतच्या पर्यटकांना घेऊन आलेली खासगी बस परतीच्या मार्गावर असताना राष्ट्रीय महामार्गावरील सापुताराजवळील घाटात संरक्षक कठडा तोडून खाली कोसळली. चालक एका मालवाहतूक वाहनापुढे जात असताना समोरून आलेल्या टेम्पोपासून वाचण्याच्या प्रयत्नात बसवरील नियंत्रण सुटले.

या अपघातात एक आठ वर्षांचा मुलगा आणि १० वर्षाच्या मुलीचा मृत्यू झाला. पाच प्रवासी गंभीर आहेत. अपघातानंतर स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी धाव मदतकार्य सुरू केले. माहिती मिळताच सापुतारा येथील अनेक रूग्णवाहिका व पोलिसांचे पथकही दाखल झाले. जखमींना गुजरात येथील शमगवान येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहे.

### राज्यात १० नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये या...

तसेच काही अध्यापकांची पदे कंत्राटी, मानधनावर भरण्यात येणार असल्याचे मंत्री श्री. मुश्रीफ यांनी सांगितले.

त्रुटी दर्शविलेल्या प्रस्तावित ९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांकरिता राष्ट्रीय वैद्यक परिषद, नवी दिल्ली यांच्याकडे शासनामार्फत अपील दाखल करण्यात येणार आहे.

या अपिलाच्या सुनावणीस शासनाकडून त्रुटी पूर्ततेसंदर्भातील हमीपत्र सादर करुन या महाविद्यालयांना परवानगी प्राप्त करण्याच्या अनुषंगाने योग्य ते प्रयत्न करण्यात येत आहेत.

सध्या नीट-यूजी-२०२४ ची परीक्षा पुढे गेली असल्यामुळे सदर ९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना परवानगी प्राप्त करुन घेऊन या शैक्षणिक वर्षी एम.बी.बी.एस. प्रथम वर्षाचे प्रवेश करण्यासाठी शासनस्तरावरुन प्रयत्न सुरु आहेत, अशी माहिती मंत्री श्री मुश्रीफ यांनी दिली आहे.

### विधान परिषद निवडणुकीत मराठा आमदार ओबीसीं...

त्यातील १४ जागा रिक्तआहे. ज्यात नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत विजयी झालेले व त्यामुळे राजीनामा देणाऱ्या सात आमदारांचा समावेश आहे. काही आमदारांचा मृत्यू झाला तर काही आमदारांनी पक्ष बदल केल्याने राजीनामा दिला. त्यामुळे२७४ आमदारच मतदान करू शकणार आहे. प्रत्येक उमेदवाराला निवडून येण्यासाठी २३ मते लागणार आहे. महायुतीकडून भाजप पाच, शिंदे व अजित पवार गटाकडून प्रत्येकी दोन असे एकूण ९ उमेदवार रिंगणात आहे. महायुतीकडचे संख्याबळ आणि त्यांना असलेला अपक्षांचा पाठिंबा लक्षात घेता त्यांचे ९ उमेदवार निवडून येणे अवघड नाही. मात्र वरवर जे चित्र दिसते तसे नाही. महाराष्ट्रात मराठा आरक्षणावरून मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष सुरु आहे. तो विधिमंडळाच्या पातळीपर्यंत झिरपला आहे. मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांचा किं वा ओबीसीतून मराठा आरक्षण देण्यास विरोध करणाऱ्या नेत्यांवर मराठा समाजाचा व पर्यायाने या समाजातील नेत्यांचा विरोध आहे. दुसरीकडे मराठ्यांना शह देण्यासाठी भाजपने ओबीसी नेत्यांना या निवडणुकीत संधी दिली आहे. त्यात प्रामुख्याने पंकजा मुंडे , परिणय फुके यांचा समावेश आहे.

नोव्हेंबर २०२३ रोजी मराठा आरक्षणाच्या मुद्यावर सर्वपक्षीय मराठा आमदारांनी मुंबईत मंत्रालयाच्या प्रवेशव्दारापुढे आंदोलन करून आम्ही प्रथम मराठा व नंतर पक्षाचे आहोत, असा संदेश दिला होता. त्याला प्रत्युत्तर म्हणून ओबीसी संघटनाही सक्रिय झाल्या होत्या.२३ डिसेंबर २०२३ मध्ये धडक मोर्चात बोलताना ओबीसी नेते शेंडगे यांनी राज्यात १६० हून अधिक ओबीसी आमदार निवडून आणून सत्ताकाबीज करू, असा इशारा दिला होता. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत जरांगे पाटील यांनी घेतलेल्या मराठा आरक्षणाच्या भूमिकेचा महायुतीला मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात फटका बसला होता. ही पार्श्वभूमी लक्षात घेता भाजपच्या ओबीसी कार्डला तोंड देण्यासाठी मराठा आमदारांची एकजूट झाल्यास व त्यांनी ओबीसी उमेदवारांना विशेषत: भाजपने दिलेल्या ओबीसी उमेदवारांना मतदान न करण्याबाबत निर्णय घेतल्यास वेगळे चित्र मतदानातूनदिसून येण्याचीशक्यता नाकारता येत नाही. सर्व राजकीय पक्ष त्यांच्या आमदारांसाठी व्हीप काढतात. व्हीपचे उल्लंघन करणाऱ्यावर अपात्रतेची कारवाई होते. मात्र एकनाथ शिंदे यांच्या पक्षफुटीनंतर या कायद्याचे काय झाले हे सर्वांना माहिती आहे. शिवाय चार महिन्याने निवडणुका असल्याने आमदार पक्षाचा आदेश किती गांभीर्याने पाळतात की जरांगे पाटील यांनी दिलेला आदेश मान्य करतात हे या निवडणुकीतून दिसून येणार आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ओबीसी आमदारांची संख्या ३७ टक्के आहे. त्यापेक्षा जास्त संख्या आणि राजकीय प्रभाव मराठा समाजाचा आहे. भाजपने एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केले असले तरी त्याचा फायदा भाजपला झाला नाही हे लोकसभा निवडणुकीत दिसून आले.

**महाराष्ट्रात प्रचाराचे झंझावाती दौरे सुरु करणार असल्याने...**आम्ही जनतेसमोर त्यांचे आशिर्वाद मागण्यासाठी जात आहोत. सिध्दीविनायकाने आम्हाला आशिर्वाद द्यावेत त्यासाठी विजयाची खूण दाखवली आहे. शेवटी जनता - जनार्दन सर्वकाही असते. लोकांचा विश्वास पुन्हा संपादन करण्यासाठी त्यांच्यासमोर जाणार आहोत असेही अजितदादा पवार यांनी सांगितले.

चांगल्या कामाची सुरुवात ही गणरायाच्या दर्शनाने केली जाते आणि आज अंगारकी असल्याने माझ्या पक्षाचे आमदार, मंत्री आणि पदाधिकारी यांना घेऊन दर्शनाला आलो आहे. १४ जुलै रोजी बारामतीमध्ये आमची जाहीर सभा होत असल्याने त्याची सुरुवात आज केल्याचे अजित पवार यांनी यावेळी सांगितले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, कृषीमंत्री धनंजय मुंडे, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील,अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री अदितीताई तटकरे, प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदूराव, प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, मुंबई कार्याध्यक्ष नरेंद्र राणे, प्रदेश प्रवक्ते संजय तटकरे, प्रदेश प्रवक्त्या वैशाली नागवडे, प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी, महिला नेत्या सुरेखाताई ठाकरे, पक्षाचे आमदार, माजी आमदार, सिध्दीविनायक मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष आमदार सदा सरवणकर, विश्वस्त सुनिल गिरी, आरती साळवी आदींसह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

### जिथे गवताच्या पात्याला भाले फुटतात तेथे शिवसेनेचा पराभव...

आता ही तेच होत आहे.आरक्षण देणे हा केंद्र सरकार चा विषय आहे पण मराठ्याना आरक्षण देणार ,अशी शिवरायांची शपथ एकनाथ शिंदे घेतात. ओबीसींना भडकवण्याचे काम ,एके काळचा लखोबा लोखंडे म्हणजे तेलगी घोटाळ्यात भरमसाट भ्रष्टाचार करुन ,करोडो रुपयाचा माज दाखवत असलेला छगन्या भुजबळ करत आहे. हे फक्त मराठ्यात फुट टाकून ,पून्हा सत्ता मिळवण्यासाठी चाललेला खेळ खंडोबा आहे. महाराष्ट्रात राहणारे ते मराठे. कोणी कुणबी ,माळी ,साळी,लोहर,सुतार पण आहे मराठेच.

मराठे एकत्र आले तर पंधरा लाखाचे आमीष दाखवत कोणी पंतप्रधान होणार नाही.लाडकी बहिणयोजनेंतर्गत1500रुपयाची लाचलुचपत दाखवत,कोणी मुख्यमंत्री होण्याची हिम्मत करणार नाही.

महाराष्ट्र हा लढवय्या आहे.मराठे पराक्रमीआहेत.मराठ्यांना लढवणे शिकवावे लागत नाही.ते मराठ्याच्या रक्तात च असते. मराठा मारता है या फिर मरता है,जसे छत्रपति संभाजी महाराज,नरविर तानाजी मालुसरे.मराठा आरमार व हिंदवी स्वराज्य हे दोन शब्द शिवाजीमहाराज,आपल्याला देवून गेले कारण आपण सगळे प्रथम मराठे आहोत,इतर जात नंतर.आपण प्रथम हिंदवी आहोत,इतर धर्म नंतर.

ज्या महाराष्ट्रात गवताच्या पात्याला भाले फुटतात त्या महाराष्ट्रात,गद्दार दारु विक्रेता संदिपान भुमरे निवडून येतो ,फार आश्चर्याची गोष्ट आहे.ज्या महाराष्ट्रात ,ज्याला गाढवावर व म्हशीवर टांग टाकून निट बसता येणार नाही तो नरेश म्हस्के निवडून यावा ,महद्आश्चर्याची गोष्ट आहे.

आमचे संजय राऊत म्हणतात, मोदी हा ब्रॅन्ड नसून ब्रॅन्डी आहे. एक ब्रॅन्डीची क्वाटर व पाचशे रुपयाचे मटन देवून श्रीकांत शिंदे निवडून आले आहेत असे मी मुळीच म्हणणार नाही. काही केलं तरी ते खासदार तर आहेतच पण महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र आहेत. मला एव्हढेच म्हणायचे आहे ज्या घरात आई व दोन मुली आहेत.या पैकी आईला व मोठ्या मुलीला लाडकी लेक योजनेचे 1500रुपये मिळणार कारण एका घरातील दोन च महिलांना या योजनेचा लाभ मिळणार आहे मग दूसरी मुलगी सावत्र आहे का,तिला या योजनेचा लाभ घेता येणार नाही. एकनाथ शिंदे यांनी अगोदर शिवसेनेत भांडण लावले. जयदेव ठाकरे व कै बिंदुमाधव ठाकरे यांचे पुत्र यांनाजवळ करणायाचा प्रयत्न केला व ठाकरे कुटुंबात भांडणे लावायचा अघोरी प्रयत्न केला व आता कुटुंबातील दोनच महिलांना 1500रुपये देतो म्हणून अनेक कुटुंबात भाडणे लावायचा प्रयत्न होतोय .हे बरोबर नाही. कोणालाच आरक्षण मिळणार नाही.कोणालाच कर्ज माफी मिळणार नाही[उद्योगपती व रामदेवबाबा सोडून] कोणालाच 1500 रूपये मिळणार नाही. कोणालाच नोकरी मिळणार नाही.जुनी पेंशन योजना लागू होणार नाही.मग कशाला हवे घटनाबाह्यसरकार!

कोरोनात सगळ्याची काळजी घेतली ते ठाकरे सरकार. घरी बसून सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार दिला ते ठाकरे सरकार. शेतकऱ्यांना कर्ज माफ केले ते ठाकरे सरकार. प्रत्येक शेतकऱ्यांची कर्जमाफी करून पुढे पन्नासहजार अनुदान दिले ते ठाकरे सरकार चांगलच होतं.

काल एकनाथ शिंदे म्हणाले की जे गेट च्या आत कोणाला घेत नव्हते ते आता शेतकऱ्यांच्या बांधावर जात आहे.होय जाणार.ज्यांना गेट च्या आत घेतले नाही ते गद्दारी करणार होते. उद्धवसाहेब मुख्यमंत्री होते तेव्हा बांधावर न जाता कर्ज माफ केले होते. आता जे सगळी कडे फसव्या योजना घेऊन महाराष्ट्रात उधळत सुटलेत ते फक्त घोषणा बाजी करतात.अंमलबजावणी शुन्य आहे. या मुळेच ,तीन महिन्यानंतर ,पुढचा मुख्यमंत्री हा उद्धवसाहेब यान्चाच असेल.

# लिटिल मास्टरला अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या शुभेच्छा !

क्रिकेट हा आज सर्वाधिक लोकप्रिय खेळ आहे. भारत हा आज क्रिकेटमधील दादा संघ आहे मात्र सत्तरच्या दशकापर्यंत भारत हा क्रिकेटमधील लिंबूटिंबू संघ समजला जात होता. त्या काळी फक्त कसोटी क्रिकेट खेळले जायचे भारताने कसोटीत विजय मिळवला ही मोठी बातमी असायची. भारताने कसोटीत विजय मिळवला ही बातमी दुर्मिळ असायची. भारताला जो विजय मिळायचा तो अर्थात भारतातच मिळायचा. भारताबाहेर परदेशात विजय मिळणे ही अशक्यप्राय गोष्ट समजली जायची. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, वेस्ट इंडिज हे त्या काळातील दादा संघ. त्यांना त्यांच्या देशात जाऊन हरवायचे ही अशक्यप्राय गोष्ट समजली जायची. अशीच अशक्यप्राय गोष्ट भारताने शक्य केली ती १९७१ साली. १९७१ साली भारताचा संघ वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर गेला होता. त्या संघात एक छोट्या चणीचा मराठी मुलगा भारतीय संघात प्रथमच खेळत होता. त्याची ती पहिलीच कसोटी मालिका. समोर वेस्ट इंडिजच्या वेगवान गोलंदाजांचा तोफखाना. हा छोट्या चणीचा मुलगा सलामीला खेळायला गेला. नुसताच खेळायला गेला नाही तर तो खेळाला असा खेळला की त्याने आपल्या पहिल्याच कसोटी मालिकेत विश्वविक्रम केला. आपल्या पहिल्याच कसोटी मालिकेत ते ही वेस्ट इंडिजच्या तोफखान्यासमोर त्याने विक्रमी ७७४ धावा काढल्या. त्याचा हा विश्वविक्रम अजूनही कोणत्या खेळाडूला मोडता आला नाही हे विशेष. त्याच्या या विक्रमी फलंदाजीने भारताने पहिल्यांदाच वेस्ट इंडिजला वेस्ट इंडिजमध्ये हरवले आणि या छोट्या चणीच्या मराठी मुलाची दखल जगाने घेतली. आपल्या पहिल्याच मालिकेत विक्रमी धावा काढणारा हा मुलगा होता सुनील मनोहर गावस्कर. हो तोच सुनील गावस्कर जो पुढे जाऊन भारतीय संघाचा आधारस्तंभ बनला. ज्याने अनेक विश्वविक्रमांना गवसणी घातली. ज्याने डॉन ब्रॅडमन यांच्या २९ शतकांच्या शतकी खेळीचा विक्रम मोडून ३४ शतके काढली. कसोटी



क्रिकेटमध्ये दहा हजार धावांचा टप्पा पार करणारा जो पहिला खेळाडू ठरला. ज्याने आपल्या देशाला अनेक अविस्मरणीय विजय मिळवून दिले त्याच सुनील गावस्कर यांचा आज ७५ वा वाढदिवस. १० जुलै १९४९ रोजी मुंबईत जन्मलेले सुनील गावस्कर हे क्रिकेटच्या इतिहासातील सर्वोत्तम आघाडीचे फलंदाज म्हणून ओळखले जातात. १९७१ ते १९८७ असे सतरा वर्ष त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले या दरम्यान त्यांनी १२५ कसोटी सामन्यात ५१.१२ च्या सरासरीने १०,१२२ धावा काढल्या. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, वेस्ट इंडिज, पाकिस्तान, न्यूझीलंड अशा सर्वच संघाविरुद्ध त्यांनी खोऱ्याने धावा काढल्या. त्या काळातील गोलंदाज आजच्या सारखे नव्हते. आग ओकणारे गोलंदाज होते. वेस्ट इंडीजचे अँडी रॉबर्ट्स, जोएल गार्नर, माल्कम मार्शल, मायकल होल्डींग, पॅट्रिक पॅटरसन, इंग्लंडचे बॉब विलिस, जॉन स्नो, इयान बॉथम, पाकिस्तानचे इम्रान खान, सरफराज खान, ऑस्ट्रेलियाचे जेफ थॉमसन, डेनिस लिली केवळ नाव घेतले तरी थरकाप उडतो. हे गोलंदाज नव्हते तर फलंदाजांचे कर्दनकाळ होते. त्यांच्या समोर धावा काढणे तर दूरच पण उभे राहणे देखील मुश्कील होते. अशा खुंखार गोलंदाजांसमोर सुनील गावस्कर खोऱ्याने धावा काढत असे ते त्यांच्या तंत्रशुद्ध फलंदाजीच्या जोरावर. सुनील गावस्कर यांची गणना क्रिकेटच्या इतिहासात सर्वात तंत्रशुद्ध फलंदाज अशी केली जाते. ते फलंदाजीस उतरत तेंव्हा पायाला पॅड आणि हातात ग्लोज एव्हढेच सुरक्षेचे साधने घालून. सुनील गावस्कर यांनी हेल्मेट कधीही वापरले नाही ते कायम डोक्यावर स्कल कॅप घालायचे. स्कल कॅप घालूनच त्यांनी त्या काळातील वेगवान गोलंदाजांचा सामना केला आणि खोऱ्याने धावा काढल्या. या दरम्यान त्यांना लिटल मास्टर पदवी मिळाली. आजही त्यांच्या नावापुढे लिटिल मास्टर असेच लिहिले जाते. या दरम्यान त्यांनी भारतीय संघाचे कर्णधारपदही सांभाळले. १९८३ चा विश्वचषक जिंकून देण्यातही त्यांचा मोलाचं वाटा होता. ते केवळ उत्कृष्ट फलंदाजच नव्हते तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षकी होते. त्यांनी कसोटीत १०० हून अधिक झेल टिपले. यष्टिरक्षक सोडून कसोटीत १०० हून अधिक झेल घेणारा पहिला भारतीय होण्याचा मान त्यांनाच मिळाला. कसोटीतील त्यांच्या अद्वितीय कामगिरीमुळे १९८० मध्ये त्यांना विस्डेन या क्रिकेटमधील प्रसिद्ध मासिका तर्फे सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू म्हणून गौरविण्यात आले. त्यांच्या क्रिकेटमधील कामगिरीबद्दल भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. निवृत्तीनंतर त्यांनी सनी डेज, रन्स अन् रुईंस व वन डे वंडर ही तीन पुस्तके लिहिली. आज ते समालोचन आणि स्तंभलेखन करतात.

आज त्यांची पंच्याहत्तरी म्हणजेच आज त्यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस. सुनील गावस्कर यांना अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा! त्यांना निरोगी आयुष्य लाभो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना.

Happy birthday little master

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# कल्याणमधील गांधारी नदीत गाळात अडकलेल्या वृध्द महिलेला वाहतूक पोलिसांनी वाचविले

कल्याण – कल्याणमधील गांधारी नदी पात्रात घरातील निर्माल्य टाकण्यासाठी गेलेली महिला रविवारी नदीला आलेल्या पुरातील चिखलात अडकली होती. ही माहिती नदी काठाने चाललेल्या एका नागरिकाला समजात त्याने हा विषय गांधारी नदी काठच्या वाहतूक चौकीत असलेल्या दोन वाहतूक पोलिसांना सांगितला. दोन्ही पोलिसांनी तत्परात दाखवत नदी काठी धाव घेऊन चिखलात अडकून वाहून जाण्याची शक्यता असलेल्या वृध्देला वाचविले.



या धाडसाबद्दल कल्याण शहर शिवसेनेचे शहरप्रमुख रवी पाटील, माजी नगरसेवक श्रेयस समेळ, शाखाप्रमुख रोहन कोट, कुणाल कुलकर्णी, सुनील वाघ, चैतन्य महाडिक, विजया पोटे, अरविंद पोटे या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कल्याण वाहतूक शाखेचे हवालदार मच्छिंद्र चव्हाण, वाहतूक सेवक संजय जैस्वार यांचा सन्मान करण्यात आला.

रविवारी मुसळधार पाऊस पडल्याने गांधारी नदीला पूर आला होता. अशा परिस्थितीत खडकपाडा भागातील एक वृध्द महिला घरातील देवाला वाहिलेले फुलांचे निर्माल्य नदीत टाकण्यासाठी आल्या होत्या. नेहमीप्रमाणे आपण निर्माल्य पाण्यात फेकून देऊ असे वृध्देला वाटले. त्या नदीच्या किनार पोहचल्या. पण तेथे पावसामुळे दलदल असल्याने त्यांचे पाय गाळात अडकले.

● त्यांना जागचे हलता येईना. त्या पुराच्या पाण्यात काठाने वाहून जाण्याची शक्यता होती. नदी काठी असलेल्या एका नागरिकाला एक महिला नदी काठी नुकतीच दिसत होती. ती कोठे गायब झाली म्हणून तो बघू लागला तर त्याला एक महिला पुराच्या पाण्यातील गाळात अडकून ती वाहून जाण्याची शक्यता दिसली. या नागरिकाने तातडीने गांधारी नदी काठच्या वाहतूक चौकीत येऊन हवालदार चव्हाण, जैयस्वार यांना ही माहती दिली.

● त्यांनी तातडीने नदी काठी जाऊन जीवाचा पर्वा न करता गणवेशताच नदी पात्रात उतरून गाळात अडकलेल्या महिलेला पहिला दूरवरून धीर दिला. त्या दिशेने पाण्यातून जाऊन त्या महिलेच्या साडीचा पाण्या बरोबर पसरलेला पदर पकडला. त्या पदराला आपल्या दिशेने खेचून हवालदार चव्हाण, जैयस्वार यांनी महिलेला नदी काठी पाण्याच्या प्रवाहातून खेचत आणले. घाबरलेल्या या महिलेला हवालदारांनी जवळच्या रुग्णालयात दाखल केले. तिच्यावर तातडीने उपचार करण्यात आल्याने या महिलेचा जीव वाचला. वाहतूक पोलिसांच्या या तत्परतेबद्दल वाहतूक विभागाच्या वरिष्ठांनी त्यांचे कौतुक केले आहे.

## कल्याणमध्ये औषध दुकान सुरू करण्यासाठी लाच मागणारा औषध निरीक्षक अटकेत



कल्याण – कल्याणमध्ये एक औषध दुकान सुरू करण्यासाठी एक लाख रूपयांची लाच मागणारा कल्याण विभागाचा अन्न आणि औषध प्रशासनाचा औषध निरीक्षक संदीप नारायण नरवणे आणि कल्याण मधील या लाचेसाठी मध्यस्थी करणारा औषध विक्रेता सुनील बाळू चौधरी (५७) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या नवी मुंबई पथकाने येथील डी मार्ट समोरील रस्त्यावर सोमवारी रंगेहाथ अटक केली. गेल्या महिन्यात पालघर जिल्ह्यात एका औषध दुकानाच्या पाहणीत एका महिला औषध निरीक्षकाने काही त्रृटी काढल्या होत्या. हे प्रकरण बाहेर येऊ नये म्हणून महिलेने एका खासगी इसमातर्फे औषध दुकानदाराला एक लाखाची लाच देण्याची मागणी केली होती. ही महिला अधिकारी नंतर लाचलुचप्रतिबंधक विभाग पथकाने सापळा लावून लाच घेताना अटक केली.

अलीकडे औषध निरीक्षक औषध दुकानादारांना अधिक प्रमाणात त्रास देत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. अधिकाऱ्यांनी म्हटले आहे, कल्याणमध्ये तक्रारदाराला पटेल मेडिकल नावाने औषध दुकान सुरू करायचे होते. या दुकानाचा परवाना मंजूर करण्यासाठी अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे अन्न निरीक्षक संदीप नरवणे आणि औषध विक्रेता खासगी इसम सुनील बाळू चौधरी यांनी तक्रारदाराकडे एक लाख रूपये लाच देण्याची मागणी केली होती. आपण एवढी रक्कम देऊ शकत नाही, असे तक्रारदाराने नरवणे यांना सांगितले होते.

## कर्जत तालुक्यातील चाफेवाडी येथे मुलांना शैक्षणिक वस्तू वाटप व वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न



कर्जत - महाराष्ट्र रत्न अनिल मधुकर जाधव, हे आपल्या सामाजिक कामासाठी संपूर्ण रायगड मध्ये प्रसिद्ध होते. शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक राजकीय क्षेत्रात त्यांनी मोठ्या प्रमाणात समाज कार्य केले काम केले.त्यांचे हे कार्य त्यांचे बंधू पत्रकार पंकेश मधुकर जाधव पुढे चालवत आहेत. त्याच प्रमाणे माऊली फाऊंडेशन (NGO ) आणि निसर्ग चेतना सेवा संस्था यांच्या मार्फत चाफेवाडी येथील शासकीय आश्रम शाळा येथे आज भेट देऊन तेथील मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले त्यानंतर विद्यार्थी सोबत वृक्ष लागवड करण्यात आली.

या कार्यक्रमाला निसर्ग चेतना सेवा भावी संस्थेच्या अध्यक्ष सौ. शालिनी सानप,माऊली फाऊंडेशनचे उपाध्यक्ष पत्रकार पंकेश जाधव,राहुल कार्ले, विनायक साळुंके,माऊली फाऊंडेशन चे सचिव संजीवन कांबळे शिवसेना शाखा प्रमुख अशोक धुळे,समाजसेवक संजय शेळके.मुख्याध्यापक M. D पाटील सर., व सर्व शिक्षक वृंद यांनी चांगले सहकार्य केले. निसर्ग चेतना सेवा भावी संस्थेचे पदाधिकारी तसेच अरुण शेळके. धनराज जाधव, संतोष सोनावले, कैलास सोनावले, पत्रकार गौतम जाधव,अजय शेळके,सचिन जगताप,आयुष जाधव, विजय जाधव, रोहित मोरे, आदी उपस्थित होते.

## एकल वापर प्लास्टिक प्रतिबंधात्मक कार्यवाहीत ३४.२ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त व ७५ हजार दंडवसूली




नवी मुंबई - स्वच्छतेप्रमाणेच प्लास्टिक प्रतिबंधावरही महानगरपालिकेचे बारकाईने लक्ष असून प्लास्टिक प्रतिबंधात्मक जनजागृती करण्यावर तसेच एकल वापर प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमा राबविण्यावर महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली भर देण्यात येत आहे. एकल वापर 'प्लास्टिक फ्री मार्केट' या आयुक्त महोदयांच्या संकल्पनेनुसार सर्वच मार्केटमध्ये कार्यवाही केली जात असून नागरिकांना त्या ठिकाणी कापडी पिशव्यांचा पर्याय उपलब्ध करुन दिला जात आहे.

प्लास्टिकचा मानवी जीवनाला व पर्यावरणाला होणारा धोका लक्षात घेऊन एकल वापर प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळण्याचे आवाहन विविध माध्यमांतून करण्यात येत आहे. याशिवाय प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमा राबवून प्लास्टिक पिशव्यांचा व एकल वापर प्लास्टिकचा उपयोग आढळल्यास दंडात्मक कार्यवाही देखील करण्यात येत आहे.

1 जुलै पासून 7 जुलैपर्यंतच्या आठवडयात 15 दुकाने / आस्थापना याठिकाणी एकल वापर प्लास्टिक आढळल्याने 75 हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली असून 34 किलो 200 ग्रॅम प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा माल जप्त करण्यात आला आहे.

यामध्ये बेलापूर विभागात 4 दुकाने/आस्थापना यावर कारवाई करीत 20 हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि 8 किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे. नेरुळ विभागात 2 दुकाने / आस्थापना यावरील कारवाईतून 10 हजार दंड व 2.5 किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक् जप्त करण्यात आले आहे.

## कल्याण डोंबिवली पालिकेत जन्म-मृत्यू दाखले मिळण्यास विलंब




कल्याण : कल्याण डोंबिवली पालिकेच्या जन्म, मृत्यू दाखले ऑनलाईन माध्यमातून देण्याच्या कार्य प्रणालीमध्ये शासन निर्देशानुसार बदल केले जात आहेत. या बदलाच्या कार्य प्रणालीची अंमलबजावणी सुरू होईपर्यंत पालिकेकडून देण्यात येणारे जन्म, मृत्युचे दाखले विलंबाने मिळू शकतात. नागरिकांनी याकामी सहकार्य करण्याचे आवाहन पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपा शुक्ल यांनी केले आहे.

कल्याण डोंबिवली पालिकेच्या जन्म, मृत्यू नोंदणी विभागात सध्या कार्यरत असलेल्या सीआरएस प्रणालीमध्ये बदल करण्यात आला आहे. ही प्रणाली प्रत्यक्ष कार्यान्वित होण्यासाठी थोडा विलंब होत आहे. त्यामुळे पालिकेकडून देण्यात येणाऱ्या जन्म, मृत्यू दाखले देण्यात थोडा विलंब होऊ शकतो, अशी माहिती डॉ. शुक्ल यांनी दिली आहे.

केंद्र शासनाच्या सुधारित प्रणालीप्रमाणे एक वर्षापूर्वी नोंदणी न केलेल्या घटनांसाठी न्यायालयाच्या आदेशाऐवजी तहसीलदार यांचे लिखित आदेश आता प्रमाणित केले जाणार आहेत. सीआरएस प्रणाली शिवाय अन्य कोणत्याही मार्गाने नियमबाह्य पध्दतीने जन्म, मृत्यू घटनांची नोंदणी करण्यात येऊ नये अथवा ठेवण्यात येऊ नये असे शासनाचे निर्देश आहेत.

खासगी रुग्णालयांनी करावयाची करावयाची नोंदणी, पालिकेला द्यावयाची माहिती, विविध प्रकारच्या दुरुस्ती तसेच शुल्क आकारणी इत्यादी संदर्भात महापालिका क्षेत्रातील खासगी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना पालिकेच्या जन्म, मृत्यू विभागातर्फे प्रशिक्षण

देण्यात येऊन आणि मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यामुळे कल्याण डोंबिवली पालिकेची जन्म, मृत्यू विभागातील नोंदणी विलंबाने होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हे दोन्ही दाखले मिळण्यास विलंब होण्याची शक्यता नाकारत येत नाही, असे डॉ. शुक्ल यांनी म्हटले आहे.

## ओला आणि सुका कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी जिल्ह्यात विशेष मोहिम

### कचरा व्यवस्थापनासाठी ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन



जि.प.ठाणे - आपल्या परिसरातील व घरातील ओला आणि सुका कचरा योग्य प्रकारे वर्गीकृत करण्यासाठी जिल्ह्यात सोमवार, दिनांक 8 जुलै 2024 पासून विशेष मोहिम राबवण्यात येत आहे. या कालावधीत विशेष मोहिम राबविण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत, त्यानुसार जिल्ह्यातील प्रत्येक गावात "स्वच्छतेचे दोन रंग, ओला हिरवा, सुका निळा" या नावाने अभियान राबवण्यात येणार आहे. "स्वच्छतेचे दोन रंग, ओला हिरवा, सुका निळा" अभियान राबवण्यात येत असून ओला व सुका कचरा व्यवस्थापनासाठी ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे तसेच प्रकल्प संचालक, जलजीवन मिशन अतुल पारसकर यांनी केले आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-2 अंतर्गत डिसेंबर 2024 पर्यंत ठाणे जिल्हा (ग्रा) हागणदारीमुक्त अधिक मॉडेल करावयाचे आहे. मॉडेल झालेल्या गावात दृष्यमान शाश्वत स्वच्छता ठेवणे आणि हागणदारीमुक्त अधिक झालेली गावे मॉडेल करणे यासाठी विविध विषयाच्या अनुषंगाने गृहभेटीच्या माध्यमातून जनजागृतीसाठी विशेष अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रत्येक गावात 5 संवादकाची निवड करण्यात येणार असून हे संवादक गृहभेटीतून माहिती देण्यात येणार आहे.

## पर्यावरण दक्षता मंडळाचा रौप्य वर्षपूर्तीच्या निमित्ताने "पर्यावरण स्नेहमेळा"



कल्याण : पर्यावरण दक्षता मंडळाचा (एन्विरो व्हिजिल) रौप्य वर्षपूर्तीच्या निमित्ताने "पर्यावरण स्नेहमेळा" सहयोग मंदिर सभागृह, घंटाळी, ठाणे येथे पर्यावरणप्रेमी आणि पर्यावरण हितचिंतकाच्या उपस्थितीत अतिशय उत्साहात पार पडला.

पर्यावरण दक्षता मंडळ ही संस्था गेली २५ वर्षे पर्यावरण शिक्षण, संशोधन, प्रकाशन, संवर्धन, जनजागरण व चळवळ या क्षेत्रांत ठाणे आणि आसपासच्या भागात कार्यरत आहे. ठाण्यात सुरुवात झालेली ही संस्था आज डोंबिवली, कल्याण, टिटवाळा, मुरबाड या भागांत देखील पोहोचली आहे. गेल्या २५ वर्षांच्या कारकिर्दीत संस्थेने अनेक नाविन्यपूर्ण प्रकल्प सुरु केले, वाढवले आणि त्यापैकी बहुतांश प्रकल्प आजही तितक्याच जोमाने बहरत आहेत.

या रौप्य वर्षपूर्तीच्या निमित्ताने पर्यावरण स्नेहमेळयामध्ये संस्थेचा २५ वर्षांचा प्रवास उलगडून दाखवणारी प्रदर्शनी लावण्यात आली. या प्रदर्शनीचे उद्घाटन भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी एन्विरो व्हिजिल चे अध्यक्ष डॉ. विकास हज़िरनीस, पर्यावरण दक्षता मंडळाचे अध्यक्ष डॉ. मानसी जोशी, पर्यावरण दक्षता मंडळाचे संस्थापक विद्याधर वालावलकर, पर्यावरण दक्षता मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. संजय जोशी, पर्यावरण दक्षता मंडळाच्या सचिव संगीता जोशी, कौपिनेश्वर सांस्कृतिक न्यासाचे अध्यक्ष उत्तम जोशी, वझे केळकर महाविद्यालयाचे डॉ. सिद्धिविनायक बर्वे, मुंबई विद्यापीठाचे डॉ. संजय देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटन समारंभानंतर सर्व मान्यवरांनी प्रदर्शनात लावलेली प्रदर्शनी बघितली. पर्यावरणाचे काम म्हणजे लोकांसमोर आरसा ठेवणारे आहे. पर्यावरणाचा वसा व्यापक व्हायचा असेल तर चळवळ बनण्याची गरज आहे.

## खासदार डॉ. श्रीकांत शिंदेंनी वारीत घेतला सहभाग संत ज्ञानेश्वर माउलींच्या पालखीचे घेतले दर्शन




कल्याण : कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी आज तरडगाव ते फलटण या संत ज्ञानेश्वर माउलींच्या पालखीच्या मार्गावर सर्व वारकऱ्यांसमवेत पायी चालत वारीत सहभाग घेतला. तसेच ज्ञानेश्वर माउलींच्या पालखीचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी वारकरी संप्रदायाचा भगवा ध्वज खांदयावर घेऊन टाळ वाजवत सर्व वारकरी बांधवांसमवेत विठ्ठलाच्या नामाचा जयघोष केला. या प्रसंगी शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे, शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे अक्षय महाराज भोसले, तसेच मोठ्या संख्येने शिवसैनिकांनी देखील वारीत सहभाग घेतला. राज्यभरातून लाखो वारकरी आषाढी एकादशीच्या निमित्ताने शेकडो दिंड्यांच्या माध्यमातून विठू रखुमाईच्या नामाचा जयघोष करत पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत आहेत. यातील संत तुकोबा माऊलींची, संत ज्ञानेश्वर माउलींची पालखी मार्गात हजारो वारकरी एकत्र येऊन पांडुरंगाच्या नामाचा जयघोष करत असता. महाराष्ट्राला लाभलेल्या या वारीच्या परंपरेत अनेक मान्यवर मंडळी देखील आवर्जून सहभाग होत असतात.

## पर्यावरण मित्र बहुद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने वृक्षारोपण !



वासिंद - पर्यावरण मित्र बहुद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्र खडवली येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरण संवर्धन हि काळाची गरज लक्षात घेऊन वृक्षारोपण उपक्रम हाती घेण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांचे वृक्षरोप देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर पेरू, चिकू, आंबा, फणस, काजू, सीताफळ, कडुनिंब अशा शंभर वृक्षारोपांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमासाठी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष अरुण पाटील, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.सुमित पाल, डॉ. संघदीप संहिता, आरोग्य सहाय्यक शिवाजी निपुर्ते, वर्षा लोंढे, अनंता पाटील, संस्थेचे राज्य उपाध्यक्ष दिनेश चौधरी, राज्य कार्यकारिणी सदस्य सुनील देसले, राज्य संघटक दिलीप ठाकरे, राज्य मार्गदर्शक सुभाष कळसकर, ठाणे जिल्हाध्यक्ष प्रशांत जाधव, संजय जाधव, सुरेश चव्हाण, विलास शेलार, रोहिदास चौधरी, युवराज तिवरे, सागर कथोरे आदि पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी गणेश जाधव, अनिल पवार, सुभाष कळसकर, दिलीप ठाकरे यांची संस्थेच्या विविध पदांवर नियुक्ती करण्यात आली. तर जयवंत शेलार यांनी वृक्षारोपण या कार्यक्रमासाठी 20 रोपे संस्थेसाठी दिली. दरम्यान, पर्यावरण मित्र ही संस्था गेली 5 ते 6 वर्षे भारतभर विविध उपक्रमातून पर्यावरण संवर्धनात हातभार लावत असून जास्तीत जास्त वृक्षारोपण करण्याचा संकल्प संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष विजय चोघळा यांचा आणि सहकारी पदाधिकाऱ्यांचा असल्याचे संस्थेचे संस्थापक राष्ट्रीय कोषाध्यक्ष प्रदीप चव्हाण यांनी आपल्या प्रास्ताविकात म्हटले.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, मूर्तीकार संघटना, स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्याचे महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे निर्देश

### शाळांमध्ये जागृती उपक्रमाचे आयोजन करण्याची केली सूचना

ठाणे : ठाणे महापालिका क्षेत्रातील गणेशोत्सव पर्यावरणपूरक व्हावा यासाठी महापालिकेच्या पर्यावरण विभागाने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, मूर्तीकार संघटना, स्वयंसेवी संस्थाची मदत घ्यावी, असे निर्देश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. या सगळ्यांच्या सहकार्याने हा उत्सव अधिकाधिक पर्यावरणपूरक करण्याकडे आपण मार्गक्रमण करू शकतो, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले आहे.

राज्य सरकार, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दिलेल्या निर्देशानुसार आपण पर्यावरणपूरक गणेशोत्सव नियमावली-२०२४ मार्च महिन्यात प्रसिद्ध केली आहे. सर्व मूर्तीकार, मूर्ती विक्रेते यांना त्यासंदर्भात माहिती दिली आहे. त्याबाबत पर्यावरण क्षेत्रातील संस्था व तज्ज्ञ आणि पारंपरिक मूर्तिकार संघटना यांच्याशी संवाद साधण्यात येत आहे. हे प्रयत्न असेच सुरू ठेवून जास्तीत जास्त संवाद साधला जावा, असे आयुक्त राव यांनी विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीत स्पष्ट केले. महापालिकेतील विभागप्रमुखांची आढावा बैठक सोमवारी सायंकाळी नागरी संशोधन केंद्र येथे झाली. या बैठकीस, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्यासह सर्व उपायुक्त आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



पर्यावरण विभागाने सक्रियपणे पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी अधिकाधिक उपक्रम करावेत. महापालिकेच्या शाळा आणि इतर शाळांमध्ये एकाच दिवशी त्यासंदर्भात उपक्रमाचे आयोजन करावे. त्यात नाटिका, स्पर्धा, रांगोळी अशा कोणत्याही स्वरुपात विद्यार्थी आणि शिक्षक यांना व्यक्त होण्याची मोकळीक द्यावी. या उपक्रमातून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश घरोघरी जाईल. तसेच, भविष्यातील नागरिकांच्या मनात त्याविषयी आत्मियता निर्माण होईल. त्यादृष्टीने पर्यावरण विभाग, शिक्षण विभाग यांनी नियोजन करावे, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

### कांदळवनावरील भरावाबाबत आक्रमक व्हा

कोलशेत–बाळकूम परिसरातील मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिनीलगत कांदळवनावर भराव टाकण्यात आला आहे. या भागाची पाहणी केल्यानंतर तेथे मोठी वाहने जाऊ नयेत यासाठी चर खणण्यात आले आहेत. कांदळवनाच्या संवर्धनाबाबत फलक लावण्यात आले आहेत. मुंबई महापालिकेनेही मोठी वाहने या भागात प्रवेश करू नयेत याची उंच वाहन अवरोधक बसवले आहेत. आता हा भराव काढून टाकण्याची कारवाई ठाणे महापालिका करणार आहे. वन विभाग आणि महसूल विभाग यांच्याशीही येथील परिस्थितीबाबत पत्र व्यवहार करण्यात आला आहे.

कांदळवनावरील हा भराव काढून टाकण्यासाठी महापालिकेच्या यंत्रणेने आक्रमक व्हावे. आपल्या कृतीतून या संवेदनशील विषयाबाबत महापालिकेची आक्रमक भूमिका दिसली पाहिजे. त्यासाठी येत्या तीन दिवसात आतापर्यंत झालेली कारवाई आणि पुढील तीन महिन्यात करायचा कृती आराखडा सादर करावा, असे निर्देश आयुक्त राव यांनी पर्यावरण आणि घनकचरा व्यवस्थापन विभागास दिले.

# विराट कोहलीच्या मालकीचे रेस्टॉरंट One8 Commune विरोधात पोलिसांनी दाखल केला एफआयआर



विराट कोहलीच्या मालकीचे रेस्टॉरंट One8 Commune विरोधात बंगळुरू पोलिसांनी एफआयआर दाखल केला आहे. सध्या विराट कोहली लंडनमध्ये आहे. टी-२० विश्वचषक विजयाचा मुंबईत कार्यक्रम झाल्यानंतर विराट कोहली लगेच लंडनसाठी रवाना झाला. पण आता बंगळुरूमधील त्याच्या मालकीच्या One8 Commune रेस्टॉरंटविरोधात पोलिसांनी एफआयआर दाखल केल्याची मोठी बातमी समोर आली आहे. पण नेमकं काय घडलं, जाणून घेऊया.

या प्रकरणाची माहिती देताना डीसीपी सेंट्रल यांनी एएनआय या वृत्तसंस्थेला याबद्दल माहिती दिली, “आम्हाला काल रात्री दीड वाजेपर्यंत उशिरा सुरू असणारे सुमारे ३-४ पब आढळले आहेत. मोठ्या आवाजात गाणी सुरू असल्याच्या तक्रारी आम्हाला मिळाल्या आहेत. पब फक्त पहाटे १ वाजेपर्यंत सुरू ठेवण्याची परवानगी आहे, असे डीसीपी त्यांनी सांगितले.

एमजी रोडवर असलेला विराट कोहलीच्या मालकीचे One8 Commune हे रेस्टॉरंट चिन्नास्वामी क्रिकेट स्टेडियमजवळ आहे. नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विराटच्या या रेस्टॉरंटबरोबर त्या परिसरातील इतरही काही पब आणि रेस्टॉरंटवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रात्री मोठ्या आवाजात गाणी सुरू असल्याच्या तक्रारी आल्याचे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले. तपास सुरू असून त्यानुसार पुढील कारवाई केली जाईल.

६ जुलै रोजी विराटच्या मालकीचे रेस्टॉरंट हे बंद करण्याच्या नियोजित वेळेच्या २० मिनिटांनंतर म्हणजेच पहाटे १.२० वाजताही खुले असल्याचे आढळले. वेळेचे उल्लंघन केल्यामुळे हा एफआयआर दाखल करण्यात आला. रात्री गस्तीवर असलेल्या उपनिरीक्षकांना One8 Commune रात्री उशिरापर्यंत सुरू असल्याची माहिती मिळाली होती. मध्यरात्री १:२० वाजता तिथे पोहोचल्यावर, उपनिरीक्षकांनी विराटच्या मालकीचे हे रेस्टॉरंट अजूनही सुरू असल्याचे आढळले आणि त्यानंतर कायदेशीर कारवाई करण्यात आली.

विराट कोहलीच्या One8 Commune च्या दिल्ली, मुंबई, पुणे आणि कोलकाता सारख्या इतर मेट्रो शहरांमध्येही शाखा आहेत. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये बेंगळुरू शाखा सुरू करण्यात आली होती. विराट-कोहलीच्या मालकीचे One8 Commune गेल्या वर्षीही चर्चेत होते, जेव्हा दिल्ली उच्च न्यायालयाने One8 Commune फोनोग्राफिक परफॉर्मन्स लिमिटेड (पीपीएल) द्वारे कॉपीराइट केलेली गाणी वाजवण्यास प्रतिबंध केला होता.

# तुळशीचे पाणी पिण्याचे अमृतासमान फायदे



प्राचीन काळापासून एक पवित्र वनस्पती म्हणून दारी राहणाऱ्या तुळशीला विशेष मान आहे. तुळशीचे औषधी गुणधर्म सुद्धा अनेक आहेत, अगदी रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यापासून ते श्वसनाच्या समस्या सोडवण्यापर्यंत अनेक प्रश्नावर तुळशीचे सेवन हे रामबाण उपाय ठरते. विशेषतः पावसाळ्यात तर अनेकजण तुळशीच्या काढ्याला अमृतासमान मानतात. खरोखरच या तुळशीच्या पानांचे फायदे आहेत का? हे फायदे मिळवण्यासाठी तुळशीचा वापर कसा करायचा? कुणी करायचा? याविषयी आज आपण तज्ज्ञांचे मत जाणून घेणार आहोत. अलीकडे सोशल मीडियावर सुद्धा तुळशीचा चहा, तुळशीचा काढा थोडक्यात तुळशीची पाने घातलेलं पाणी पिण्याचे फायदे अनेकजण सांगत असतात, त्यातील तथ्य आज आपण पडताळून पाहूया..

तुळशीचे पाणी म्हणजे काय? कसं बनवायचं?

सल्लागार, आहारतज्ज्ञ आणि प्रमाणित मधुमेह प्रशिक्षक, कनिक्का मल्होत्रा यांनी इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या माहितीनुसार, तुळशीची पाने पाण्यात टाकून पिणं म्हणजे तुळशीचं पाणी पिणं, हे इतकं साधं सोपं पेय आहे. तुम्हाला पाण्यात पाने १० ते १५ मिनिटे भिजू द्यायची आहेत. वाटल्यास तुम्ही मंद आचेवर काही वेळ हे पाणी पानांसहित उकळू शकता. जास्त वेळ उष्णतेच्या संपर्कात आणू नये अन्यथा फायदे कमी होतात. याशिवाय आपण अगोदरच उकळून घेतलेल्या पाण्यात तुळशीची ताजी पाने किंवा वाळवलेल्या तुळशीच्या पानांची पावडर करून मिसळू शकता. हे एक नैसर्गिक डिटॉक्स पेय आहे, जे तुमच्या शरीराला स्वच्छ करू शकते.

अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि इतर फायदेशीर पोषकसत्व असणाऱ्या या तुळशीचे पाणी आरोग्याच्या विविध समस्यांवर रामबाण उपाय मानले जाते. याबाबत मल्होत्रा यांनी पुढे सांगितले की, “जगभरात शरीरासाठी पोषण, मानसिक शांती व दीर्घायुष्य यासाठी आयुर्वेदाला नव्याने ओळख मिळत आहे.”

तुळशीचे पाणी पिण्याचे फायदे

रोगप्रतिकारक शक्तीसाठी बूस्टर

तुळशीला ॲडप्टोजेन मानले जाते, याचा अर्थ तुळस शरीराला तणावाशी जुळवून घेण्यास आणि संतुलन राखण्यास मदत करते. तुळशीमध्ये इम्युनोमोड्युलेटरी गुणधर्म देखील असतात, याचा अर्थ ते शरीराची रोगप्रतिकारक प्रतिक्रिया वाढवू शकते. हे गुणधर्म संक्रमण आणि आजारांपासून लढण्यास मदत करू शकतात.

तणावावर नियंत्रण

तुळशीचे पाणी शरीराला शांत करू शकते, अंतर्गत हालचालींची लय संतुलित राहते. त्यामुळे ज्यांची जीवनशैली फार तणावग्रस्त आहे त्यांनी दिवसातून एकदा हे तुळशीचे पाणी प्यायल्यास फायदा होऊ शकतो.

पचनाला मदत

तुळशीमध्ये कार्मिनेटिव गुणधर्म असतात जे गॅस आणि सूज कमी करण्यास मदत करू शकतात. काही अभ्यासांमध्ये असेही सुचवले आहे यामुळे आतड्याचे कार्य सुधारू शकते, पचनास मदत होते.

श्वसनासाठी मदत

वर्षानुवर्षे तुळशीच्या पानांचा वापर खोकला, सर्दी आणि दमा यांसारख्या श्वसनाच्या समस्या दूर करण्यासाठी केला जात आहे. तुळशीमध्ये कफनाशक गुणधर्म असतात, कफ बाहेर टाकण्यास आणि रक्त साचून गुठळ्या होण्याचे प्रमाण कमी करण्यास मदत करतात. तुळशीचे दाहक-विरोधी गुणधर्म घसा खवखवणे किंवा जळजळणाऱ्या श्वसननलिकेस शांत करू शकतात.

अँटिऑक्सिडंटचा पॉवरहाऊस

तुळशीमध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि पॉलीफेनॉल्ससारखे विविध अँटिऑक्सिडंट्स असतात. हे अँटिऑक्सिडंट्स शरीरातील मुक्त रॅडिकल्सच्या नुकसानाशी लढण्यास मदत करतात, तुळशीच्या पाण्याचे सेवन केल्याने शरीराला आवश्यक अँटिऑक्सिडंट्सचा पुरवठा वाढू शकतो ज्यामुळे अनेक आजारांपासून संरक्षण मिळू शकते. याविषयी अजून सविस्तर संशोधन होण्याची गरज आहे.

तुळशीच्या पाण्याचे सेवन कोणी टाळावे?

मल्होत्रा सांगतात की, “तुळशीमध्ये रक्त पातळ करण्याचे गुणधर्म असू शकतात. तुम्हाला रक्तस्रावाचा विकार असल्यास किंवा वॉरफेरिन सारखी रक्त पातळ करणारी औषधे घेत असल्यास, तुळशीचे पाणी प्यायल्याने रक्तस्राव होण्याचा धोका वाढू शकतो. त्यामुळे सेवन करण्याआधी आपल्या आरोग्य स्थितीशी परिचित असलेल्या तज्ज्ञांचा सल्ला आवर्जून घ्या.”

याशिवाय, गर्भारपणात किंवा स्तनपान करणाऱ्या मातांनी सुद्धा शक्यतो तुळशीच्या पाण्याचे सेवन टाळावे. यामुळे गर्भाशय आकुंचित होऊन गुंतागुंत वाढू शकते. तसेच काही व्यक्तींना तुळशीची किंवा लॅमियासी (मिंट) गटातील वनस्पतींची ॲलर्जी असू शकते. तुळशीचे पाणी प्यायल्यावर जर तुम्हाला पुरळ, खाज सुटणे किंवा सूज येणे यासारख्या कोणत्याही ॲलर्जीचा त्रास होत असेल तर तुळशीचे पाणी पिणे बंद करा आणि तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.”

# दोन लग्नाचा घाट, चार वर्षांचा संसार; हार्दिक-नताशामध्ये सगळंच संपलं?



विश्वचषक जिंकल्यानंतर हार्दिक पांड्या सध्या त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे बराच चर्चेत आलाय. नताशा आणि त्याच्यामध्ये काहीच अलबेल नसल्याच्या बातम्या वारंवार समोर येतायत. त्यातच त्यांच्या सोशल मीडियावरच्या पोस्टमुळे या चर्चांना सारखा दुजोरा दिला जातोय. त्यातच आता त्यांच्या एका जवळच्या मित्राने त्यांच्या नात्याविषयी एक मोठा खुलासा केला आहे. त्यामुळे आता हार्दिक आणि नताशामध्ये सगळंच संपलं असल्याचं म्हटलं जातंय.

टाईम्स नाऊच्या वृत्तानुसार, त्यांच्या एका जवळच्या मित्राने आता त्यांच्या नात्यामध्ये काहीच अलबेल नसल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे चार वर्षांचा संसार मोडून हार्दिक आणि नताशा खरंच वेगळे होणार का? हा प्रश्न अनेकांना पडला आहे. पण अद्यापही या दोघांनी यावर कोणतंही अधिकृत भाष्य केलेलं नाही.


मित्राचा मोठा खुलासा

हार्दिक आणि नताशाच्या जवळच्या मित्राने म्हटलं की, हार्दिक आणि नताशा दोघांना पॅचअप करायचं नाहीये. दोघांनाही त्यांच्यातले वाद मिटवायचे नाहीत. हार्दिकच्या काही गोष्टींवर नताशा प्रचंड नाराज आहे. पण तिलाही हे नात पुन्हा जोडावं अशी इच्छा नाही. पण येणाऱ्या काळात काय होईल कुणीच सांगू शकत नाही. पण आताच्या परिस्थितीमध्ये हार्दिक आणि नताशा हे दोघेही त्यांच्यातले वाद मिटवू इच्छित नाही. कदाचित त्या दोघांमधलं नातं आता संपलं आहे.

हार्दिक-नताशाच्या सोशल मिडिया पोस्टमुळे चर्चांना दुजोरा

दरम्यान हार्दिक आणि नताशाच्या सोशल मीडियावरील पोस्टमुळे त्यांच्यातील घटस्फोटाच्या चर्चांना दुजोरा दिला जातोय. कारण विश्वचषक जिंकल्यानंतर हार्दिकने फक्त त्याच्या मुलासोबतची पोस्ट टाकली. त्यावर त्याने त्याचा मुलासोबत फोटो पोस्ट करत त्यावर म्हटलं की, माझं सगळं काही, मी जे काही करतो, ते फक्त तुझ्यासाठी असतं. तसेच हार्दिकच्या विजयानंतर नताशाने त्याच्यासाठी एकही पोस्ट टाकली नाही. पण काही दिवसांपूर्वी तिने केलेल्या पोस्टमुळे तिने देखील त्यांच्या घटस्फोटाच्या चर्चांना दुजोरा दिला असल्याचं म्हटलं जातंय. त्या पोस्टमध्ये नताशाने म्हटलं होतं की, 'माझ्याकडून तुमच्यासाठी एक जेंटल रिमायंडर, देवाने लाल समुद्र कधीही हटवला नाही. त्याने त्याचं विभाजन केलं. याचाच अर्थ असा की, तुमच्या आयुष्यातल्या अडचणी देव काढून टाकणार नाही, पण तो त्यातून मार्ग नक्कीच काढेल.'

# गायिका उषा उथुप यांच्या पतीचे निधन, घरात टीव्ही पाहताना आला हृदयविकाराचा झटका



पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित पॉप गायिका उषा उथुप यांच्या कुटुंबातून एक वाईट बातमी समोर आली आहे. उषा उथुप यांच्या पतीचे निधन झाले आहे. त्यांचे पती जानी चाको उथुप यांची हृदयविकाराच्या झटक्याने प्राणज्योत मालवली. घरी टीव्ही पाहत असताना ही घटना घडली.

कोलकातामधील घरी टीव्ही पाहत असताना त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागलं अशी माहिती समोर आली आहे. जानी उथुप यांनी अस्वस्थ वाटत असल्याची तक्रार केली. त्यांची प्रकृती ढासळत असल्याचे पाहून कुटुंबियांनी त्यांना जवळच्या रुग्णालयात नेलं, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. जानी ७८ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने कुटुंबासह संगीत आणि चित्रपटसृष्टीत शोककळा पसरली आहे.

जानी चाको उथुप हे चहा उत्पादनाच्या क्षेत्रात काम करायचे. या जोडप्याला एक मुलगा सनी आणि मुलगी अंजली ही दोन अपत्ये आहेत. उषा उथुप यांच्या पतीवर आज मंगळवारी (९ जुलै रोजी) अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती कुटुंबियांनी दिली.

जानी चाको उथुप हे उषा यांचे दुसरे पती होते. उषा यांनी दोन लग्नं केलीत. त्यांचे पहिले लग्न रामू अय्यरशी झाले होते. मात्र, फक्त पाच वर्षात ते विभक्त झाले. ७० च्या दशकाच्या सुरुवातीस उषा व जानी या दोघांची भेट झाली होती. पहिल्या घटस्फोटानंतर उषा यांनी जानी यांच्याशी दुसरं लग्न केलं होतं. उषा उथुप या बॉलीवूडमधी सुप्रसिद्ध गायिका आहेत. त्यांनी ६० च्या दशकात गायनास सुरुवात केली. ‘एक दो तीन चार’ या गाण्यानंतर त्यांना हिंदी चित्रपटसृष्टीत ओळख व लोकप्रियता मिळाली.

## दिनविशेष

**घटना**

२०२२: मलेशिया - देशातील अनिवार्य फाशीची शिक्षा रद्द केली जाईल अशी घोषणा...
२००० : नायजेरिया देशातील फुटलेल्या तेलवाहिनीत स्फोट होऊन २५० कामगारांचे जळुन निधन.
१९९५ : आंग सान सू क्यी - म्यानमारमधील लोकशाही चळवळीच्या प्रणेत्या यांची ६ वर्षांच्या नजरकैदेतून बिनशर्त मुक्तता करण्यात आली.
१९९२: विक्रम इनसॅट भू-केंद्र - राष्ट्राला अर्पण केले.
१९७८: महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, मुंबई - स्थापना झाली.
१९७३ : बांगलादेश - देशाला पाकिस्तानच्या संसदेने मान्यता दिली.
१९६२ : टेलस्टार- १ - हा पहिला अमेरिकन दळणवळण उपग्रह प्रक्षेपित केला.

**जन्म**

१९५० : बेगम परवीन सुलताना पतियाळा घराण्याच्या शास्त्रीय गायिका पद्म भूषण, पद्मश्री
१९४९ : सुनील गावसकर भारतीय क्रिकेटपटू, समालोचक- पद्म भूषण
१९४५ : व्हर्जिनिया वेड - इंग्लिश टेनिस खेळाडू
१९४३: आर्थर एशे - विम्बल्डन, यूस ओपन आणि ऑस्ट्रेलियन ओपन जिंकणारे पहिले कृष्णवर्णीय, अमेरिकन टेनिस खेळाडू (निधन: ६ फेब्रुवारी १९९३)
१९४० : लॉर्ड मेघनाद देसाई - अर्थशास्त्रज्ञ
१९३४: रजनीकांत आरोळे- जामखेड मॉडेलचे जनक पद्म भूषण, रॅमन मॅगसेसे पुरस्कार ( निधन: २६ मे २०११)

**निधन**

२०२० : आनंद मोहन चक्रबर्ती भारतीय-अमेरिकन सूक्ष्मजीवविज्ञानी आणि संशोधक (जन्म: ४ एप्रिल १९३८)
२०२० : विकास दुबे- भारतीय गुंड असून राजकारणी
२०१३: गोकुलानंद महापात्रा - भारतीय लेखक आणि शैक्षणिक (जन्म: २१ मे १९२२)
२००५: जयवंत कुलकर्णी पार्श्वगायक (जन्म: ३१ ऑगस्ट १९३१)
२०००: वक्कम मजीद भारतीय पत्रकार आणि राजकारणी (जन्म: २० डिसेंबर १९०९)
१९९५ : डॉ. रामकृष्ण विष्णू केळकर गरिबांचे डॉक्टर म्हणून प्रसिद्ध
१९८९: प्रभाकर ऊर्ध्वरेषे साम्यवादी विचारवंत साहित्यिक
१९७१ : भिखारी ठाकूर - भोजपुरी भाषेचे शेक्सपिअर (जन्म: १८ डिसेंबर १८८७)
१९७० : ब्यान बेनेडिक्ट्सन आईसलँडचे १३वे पंतप्रधान
१९६९: डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर इतिहासकार (जन्म: ३० मे १८९४ )

# रवीचंद्रन अश्विन आता बुद्धिबळाच्या पटावर; अमेरिकन गॅम्बिट्स संघाचा सहमालक

रवीचंद्रन अश्विनची गणना जगातील स्टार फिरकीपटूंमध्ये केली जाते. अश्विनच्या फिरकीच्या बळावर भारतीय संघासाठी अनेक सामने जिंकले आहेत. अश्विनचा कॅरम बॉल खेळणं हे महान फलंदाजासाठीही अवघड असतं. पण क्रिकेटबरोबरच अश्विन आता बुद्धिबळाच्या पटावरही आला आहे. अश्विन ग्लोबल चेस लीगमधील अमेरिकन गॅम्बिट्स संघाचा सह-मालक बनल्याची बातमी समोर आली आहे.

ग्लोबल चेस लीगचा पहिला हंगाम २०२३ मध्ये खेळवण्यात आला होता. आता या लीगचे दुसरे वर्ष २०२४ मध्ये खेळवले जाणार आहे. दरम्यान या लीगमधील एक संघ रवीचंद्रन अश्विनने विकत घेतला आहे. ग्लोबल चेस लीगच्या दुसऱ्या सत्रात सहभागी होणारा सर्वात नवीन संघ अमेरिकन गॅम्बिट्स असणार आहे. ग्लोबल चेस लीग ही स्पर्धा टेक महिंद्रा आणि आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघ यांच्या संयुक्त मालकीची लीग आहे. प्रसिद्ध उद्योगपती प्रचूर पीपी, व्यंकट के नारायण आणि अश्विन यांच्या मालकीचे अमेरिकन गॅम्बिट्स या स्पर्धेत चिंगारी



गल्फ टायटन्सची जागा घेतील. लीगचा दुसरा हंगाम ३ ते १२ ऑक्टोबर दरम्यान लंडनमध्ये खेळवला जाईल.

ग्लोबल चेस लीगच्या दुसऱ्या सत्रात अश्विनचे अमेरिकन गॅम्बिट्स, अल्पाइन एसजी पायपर्स, पीबीजी अलास्का नाइट्स, गंगा ग्रँडमास्टर्स, मुंबा मास्टर्स आणि गतविजेते त्रिवेणी कॉन्टिनेंटल किंग्स यांच्यात विजेतेपदासाठी लढत होईल. पाच वेळा विश्व बुद्धिबळ चॅम्पियन ठरलेल्या विश्वनाथन आनंदनेही या दिग्गज क्रिकेटपटूचे बुद्धिबळाच्या जगात स्वागत केले. विश्वनाथन आनंदने एक्सवर पोस्ट करत म्हटले, अश्विन, बुद्धिबळाच्या जगात तुझ्या नवीन व्यवसायाबद्दल अभिनंदन! क्रिकेटमध्ये सर्वोत्तम गोलंदाजी करणारा खेळाडू आहेसच त्याप्रमाणे अमेरिकन गॅम्बिट्ससह ग्लोबल चेस लीगमध्ये समान स्पर्धात्मक वातावरण निर्माण करशील, अशी मला खात्री आहे.

अश्विन म्हणाला “अमेरिकेन गॅम्बिट्सची बुद्धिबळ जगताला ओळख करून देताना आम्हाला आनंद होत आहे. सहमालक म्हणून मी संघाचा प्रवास पाहण्यास आणि त्यांच्या यशात योगदान देण्यासाठी उत्सुक आहे.

## राशि भविष्य

**मेष** स्वत:ची प्रगती करणा-या प्रकल्पांमध्ये तुमची ऊर्जा खर्च करा त्यामुळे तुमची स्थिती सुधारेल. कोणतीही गुंतवणूक घाईगडबडीत करू नका. गुंतवणुकीचा सर्व बाजूंनी विचार केल्याशिवाय पुढे जाऊ नका, अन्यथा नुकसान होऊ शकते. सर्वसाधारणपणे लाभदायक दिवस आहे, पण तुमच्यामते ज्याच्यावर विश्वास ठेवावा अशी व्यक्ती तुम्हाला मान खाली घालायला लावू शकते.

**वृषभ** तुमच्या दयाळू स्वभावामुळे आज अनेक आनंदाचे क्षण अनुभवाल. तुम्ही जर अधिक धनप्राप्तीची अपेक्षा करत असाल तर सुरक्षित अशाच आर्थिक योजनांमध्ये पैसे गुंतवा. तुमचे व्यक्तिमत्व आणि मोहक आकर्षकता यामुळे काही नवे मित्र जोडाल. रोमान्ससाठी आजचा दिवस फार काही योग्य नाही, खऱ्या प्रेमाची अनुभूती मिळणे अशक्य आहे.

**मिथुन** तुमच्या स्वत:साठी आज तुम्हाला पुरेसा वेळ देता येईल, म्हणून प्रकृती चांगली राखण्यासाठी दूरवरपर्यंत चालण्याचा व्यायाम करा. दुस-यांच्या शब्दावर विसंबून तुम्ही गुंतवणूक केलीत तर आज आर्थिक तोटा होण्याची शक्यता आहे.

**कर्क** कलात्मक काम तुम्हाला आराम मिळवून देईल. तसे तर आपला पैसा दुसऱ्यांना देणे कुणाला आवडत नाही परंतु, आज तुम्ही कुणी गरजूला पैसा देऊन आनंदाचा अनुभव कराल. तुम्हाला निवांत आरामाची गरज आहे आणि जवळचे मित्र व कुटुंबातील सदस्यांमध्ये राहून आनंदाचा काळ घालवा.

**सिंह** संयम बाळगा, आपले निरंतर प्रयत्न आणि समजून घेण्यामुळे आपणास हमखास यशप्राप्ती होणार आहे. तुमच्या वडिलांचा सल्ला आज तुम्हाला कामाच्या क्षेत्रात धन लाभ करवून देऊ शकते. तुमच्या जवळच्या व्यक्ती तुमच्या खाजगी आयुष्यात अडचणी निर्माण करतील.

**कन्या** आज तुम्ही करमणुकीत रमाल. क्रीडा प्रकार आणि मैदानावरील स्पर्धेमध्ये सहभागी व्हाल. तुमच्या जवळ आज पैसा ही पर्याप्त असेल आणि या सोबतच मनात शांती असेल. नातेवाईकांच्या घरी जाऊन एखाद-दोन दिवस घालवलेत तर दैनंदिन धकाधकीच्या जीवनातून थोडा आराम, विश्रांती मिळेल.

**तूळ** खाण्यापिण्याबाबत दक्षता बाळगा. निष्काळजीपणा तुम्हाला आजारी पाडू शकतो. आज घरातून बाहेर जातांना मोठ्यांचा आशीर्वाद घेऊन निघा यामुळे तुम्हाला धन लाभ होऊ शकतो. इतरांचे लक्ष वेधून घेण्यासाठी तुम्हाला फारसे काही प्रयत्न करावे लागणार नाहीत कारण आजचा दिवस तुमच्यासाठी भला आहे.

**वृश्चिक** तुमची चिंता, काळजी मिटविण्याची आत्यंतिक गरज असणारा काळ आहे. आपली शारीरिक उत्साह तर त्यामुळे कमी होतोच पण तुमच्या आयुष्यदेखील कमी होते हे आपणास लक्षात घ्यावे लागेल. ज्या लोकांनी आपला पैसा सट्टेबाजी मध्ये लावलेला आहे आज त्यांना नुकसान होण्याची शक्यता आहे.

**धनु** मुलांमुळे आजची संध्याकाळ प्रसन्न राहील. रटाळ कंटाळवाण्या, त्रासदायक दिवसाचा निरोप घेण्यासाठी, रात्रीच्या जेवणाचा मस्तपैकी प्लॅन करा. मुलांच्या सहवासात तुम्ही आणखीन उल्हसित व्हाल. दीर्घकालीन, प्रलंबित अशी गुंतवणूक टाळा. मित्रमैत्रीणींबरोबर फिरायला जा आणि काही आल्हाददायक क्षण अनुभवा.

**मकर** तुमचा आनंदी उत्साही स्वभाव इतरांना आनंद देणारा असेल. घरात काही कार्यक्रम असण्याने आज तुम्हाला खूप धन खर्च करावे लागू शकते ज्यामुळे तुमची आर्थिक स्थिती खराब होऊ शकते. मुलांच्याबाबतीत सहनशीलता बाळगा किंवा तुमच्या पेक्षा कमी अनुभवी व्यक्तींबाबत धीर धरा.

**कुंभ** मौज, मस्ती, मजा आणि करमणूकीचा दिवस. प्रलंबित देणी आल्यामुळे आपली सांपत्तिक स्थिती सुधारेल. घरगुती कामं बराच काळ व्यस्त ठेवतील. नैसर्गिक सौंदर्याने आज तुम्ही भारावून जाण्याची शक्यता आहे. तुम्ही तुमच्या संकल्पना चांगल्या त-हेने मांडल्यात आणि तुमच्या कामात उत्साह आणि शेवटपर्यंत चिकाटी दाखवलीत - तर तुम्ही फायद्यात राहाल.

**मीन** भीती, चिंता तुमच्या सुखी समाधानी, आनंदी जगण्याला मारक ठरू शकते. आपल्या विचारांमधून आणि कल्पनांमधूनच चिंतेचा जन्म झाला आहे हे तुम्हाला लक्षात ठेवावे लागेल. या चिंतेमुळेच तुमचा उत्स्फूर्तपणा मारला जातो, जगण्याचा आनंद हिरावून घेतला जातो आणि तुमच्या कार्यक्षमता अपंग होते.

## गोवा पर्यटन व्यवस्थापन विधेयकाच्या मसुद्यावर सार्वजनिक अभिप्रायासाठी मुदतवाढ

**जनतेची मते आणि सूचनांसाठी १५ दिवसांनी वाढवली अंतिम मुदत**



मुंबई - गोवा पर्यटन प्रचार आणि व्यवस्थापन विधेयक, 2024 चा मसुदा लोकांच्या हरकती आणि सूचनांसाठी खुला आहे. माननीय पर्यटन मंत्री श्री. रोहन अ. खंवटे आणि आमदार यांनी आज जाहीर केले की सुरुवातीला 6 जुलै ही अंतिम मुदत 15 दिवसांनी वाढवण्यात आली आहे.

श्री. खंवटे म्हणाले की, राज्यातील पर्यटनाला नवा आकार देणे आणि बेकायदेशीर कामांवर कारवाई करणे हे या विधेयकाचे उद्दिष्ट आहे. रोजगार निर्मिती आणि अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठीही हे विधेयक फायदेशीर ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या विधेयकामुळे राज्यातील पर्यटन उद्योगाला बळ मिळेल, यावर त्यांनी भर दिला. सर्व संबंधितांना विश्वासात घेऊन हे विधेयक मांडण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. येत्या 10 दिवसांत या विधेयकाबाबत स्पष्टीकरण देण्यासाठी मंत्री, आमदार आणि उद्योग क्षेत्रातील सर्व भागधारकांना सादरीकरण केले जाईल.

स्पर्धात्मक पर्यटन युगात, गोवावासीयांसाठी त्यांचे व्यवसाय टिकवणे आवश्यक आहे. त्यासाठी हे विधेयक फायदेशीर ठरणार आहे. पर्यटन क्लस्टर्सच्या विकासासाठी 27 वेगवेगळ्या समित्या नेमण्यात आल्या असून त्यानुसार महसुलाचे वाटप करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. गेल्या दीड वर्षात संबंधित यंत्रणेने केलेल्या अभ्यासातून हे विधेयक तयार करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

मागील 40-45 वर्षांत पर्यटनाचा कायापालट झाला आहे. अशा वेळी जुन्या कायद्यांमध्ये बदल करणे गरजेचे आहे. हे विधेयक ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम असोसिएशन ऑफ गोवा (TTAG), भागधारक, पोलिस, इतर विभाग आणि तज्ज्ञ मंडळी आदींसोबत 33 पेक्षा जास्त बैठका घेऊन सल्लामसलत केल्यानंतर तयार करण्यात आले आहे. विधेयकाचा मसुदा सूचनांसाठी खुला असल्याने सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. लोकांकडून अधिक सूचना आणि मतांसाठी आणखी 15 दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे.

2% शाश्वतता शुल्क आकारले जाईल हा दावा निराधार आहे; हा 2% पर्यंतचा कर आहे आणि एकदा ते तयार केल्यावर तो फक्त संबंधित क्लस्टरपुरता मर्यादित असेल. त्यामुळे त्याबाबत मुद्दा बनवणे अनावश्यक असल्याचा आरोप खंवटे यांनी केला. या विधेयकामुळे विभागातील महसूल गळती रोखण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.

गोवा आणि गोवावासीयांच्या हितासाठी सरकार काम करत असून, सर्वांनी रचनात्मक कार्य करणे अधिक योग्य ठरेल, असे आवाहनही श्री. खंवटे यांनी केले.

## बीए/बीएस्सी बीएड, विधि पाच वर्ष अभ्यासक्रमांच्या प्रवेशांना सुरुवात




मुंबई : विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने जाहीर केलेल्या संभाव्या वेळापत्रकानुसार विधी पाच वर्ष आणि बीए, बीएस्सी बीएड इंटीग्रेटेड अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. या दोन्ही अभ्यासक्रमांच्या प्रवेशाचे वेळापत्रक संकेतस्थळावर जाहीर करण्यात आले आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी कक्ष) घेण्यात आलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला विलंब होत असल्याची टीका पालक व विद्यार्थी संघटनांकडून होत आहे. सीईटी कक्षाने संभाव्य वेळापत्रक जाहीर करून विद्यार्थी व पालकांना दिलासा दिला होता. त्यानुसार आता विधि पाच वर्ष आणि बीए / बीएस्सी बीएड इंटीग्रेटेड अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरूवात करण्यात आली आहे.

**बीए/ बीएस्सी – बीएड चार वर्ष इंटीग्रेटेड**

- ऑनलाईन अर्ज भरणे – ११ जुलैपर्यंत
- कागदपत्रे तपासणी व अर्ज निश्चित करणे – १२ जुलैपर्यंत
- अंतरिम यादी- १३ जुलै
- हरकती व सूचना- १२ ते १४ जुलै
- अंतिम यादी- १५ जुलै

**असे आहे वेळापत्रक एलएलबी पाच वर्ष**

- ऑनलाईन अर्ज भरणे – १३ जुलैपर्यंत
- कागदपत्रे तपासणी व अर्ज निश्चित करणे – १४ जुलैपर्यंत
- अंतरिम यादी- १५ जुलै
- हरकती व सूचना- १५ ते १७ जुलै
- अंतिम यादी- १९ जुलै

विधि पाच वर्ष अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना १३ जुलैपर्यंत अर्ज करता येणार आहे. त्यानंतर प्रवेशाची अंतरिम यादी १५ जुलै रोजी जाहीर केल्यानंतर विद्यार्थ्यांना त्यावर १५ ते १७ जुलैपर्यंत आक्षेप नोंदवता येणार आहे. या काळात अर्ज दुरुस्ती करण्याची सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल. त्यानंतर अंतिम यादी १९ जुलै रोजी जाहीर करण्यात येणार आहे. गतवर्षी एलएलबी ५ वर्ष अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा अधिक कल होता. बीए / बीएस्सी बीएड चार वर्षांच्या इंटीग्रेटेड अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना ११ जुलैपर्यंत अर्ज करता येणार आहेत. त्यानंतर १२ जुलै रोजी अंतरिम यादी जाहीर करण्यात येणार आहे. यादीवर आक्षेप नोंदवण्यासाठी विद्यार्थ्यांना दोन दिवसाचा कालावधी देण्यात येणार आहे. त्यानंतर १५ जुलै रोजी अंतिम यादी जाहीर केली जाईल. दरम्यान, सीईटी सेलने पसंतीक्रम देण्याचे वेळापत्रक अद्याप जाहीर केलेले नाही.

## भाजीपाला लागवडीने बहरणार परसबाग २४ हजार बियाण्यांच्या पाकिटाचे वाटप



अलिबाग - कोकणात परसबागेला अनन्यसाधारण महत्त्व आहे .दररोजच्या जेवणासाठी आवश्यक भाजीपाला अनेकजण परसबागेत लावतात. कढीपत्त्यापासून ते नारळापर्यंत परसबागेत लागवड केली जात असून आता कृषी विभागाकडूनही प्रोत्साहन मिळत आहे. दुर्गम भागातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने यंदाच्या खरीप हंगामा करता बियाण्याच्या 24 हजार पाकिटाचे वाटप शेतकऱ्यांना करण्यात आले आहे.शिवाय परसबागेत भाजीपाला लागवडी ते प्रात्यक्षिके दाखवून त्यांना योजनेस सामावून घेण्यात येत आहे. विशेषतः कुपोषणाचे प्रमाण जास्त असलेल्या कर्जत, खालापूर, पेण या आदिवासी बहुल तालुक्यामध्ये पोस्टीक आहार पुरवण्यासाठी घराभोवती असलेल्या परसबागेत आता भाजीपाला लागवडीस प्रोत्साहन दिले जात आहे . यासाठी टोमॅटोच्या पुसा, रुबी वाणाची निवड करण्यात आली आहे. तर भेंडीच्या अर्का, अनामिका, मिरचीचे ज्वालावान ,चवळीचे पार्वती वानाचे 25 ग्राम वजनाचे पाकीट निवड झालेल्या शेतकऱ्यांना दिले आहे. कुपोषण मुक्तीसाठी तसेच आदिवासींना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने रायगड जिल्हा परिषदेकडून भाजीपाला व फळांची लागवडीसाठी परसबागेला पसंती दिली जात आहे. आदिवासींच्या आहारात जीवनसत्व व इतर आवश्यक पोषक द्रव्य समाविष्ट करण्याच्या उद्देशाने ही पौष्टिक आहार योजना सरकारने अमलात आणली आहे. मात्र त्याची व्यापकता वाढवण्यात आलेली नव्हती. परसबागेतील भाजीपाला लागवडीने सकस आहार घरच्या घरी पिकवता येतो. कोकणात ही पद्धत फार वर्षापासून आहे .परंतु काही तालुक्यांमध्ये ती विकसित होणे गरजेचे आहे .यासाठी टोमॅटो, भेंडी, मिरची चवळीच्या 25 ग्राम बियाण्याचे पाकिटे देण्यात येत आहेत. अशी 24 हजार पाकिटांच्या संच वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे .

**सतीश बोराडे**
**प्रकल्प संचालक आत्मा**

## महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या केंद्रीय कार्यकारणीची सभा परभणी येथे संपन्न





परभणी - महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या केंद्रीय कार्यकारणीची सभा परभणी येथे संपन्न महासंघाचे धेय्य धोरण व पुढील वाटचालीची दिशा जमलेल्या राज्य,विभागीय,तालुका,सर्व पदाधिकारी यांना महासंघाचे राज्य अध्यक्ष मा.चंद्रकांत जी जाधव यांनी पटवून दिले कर्मचाऱ्यांनवर होणारा अन्याय कसा दुर करता येईल याचे मार्गदश केले सभे साठी उपस्थित राज्य उपाध्यक्ष,दिलीप शितोले राज्य प्रमुख सल्लागार,रवींद्र वेंदे,राज्य महासचिव,प्रविण खाडे,खरात हे सभेच्या अध्यक्ष स्थानी होते.लातूर जिल्हा अध्यक्ष,नागसेन काबळे,रवि कुरेल, साके, गायकवाड, राज्य अध्यक्ष यांच्या हास्ते साहेबराव बाबाराव पवार यांची राज्य सहसचिव पदी निवड करण्यात आली तसेच या वेळी अंबादास वाटोडे यांची परभणी जिल्हा अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली तर विनोद साबळे यांची धराशिव जिल्हा अध्यक्ष पदी नियुक्ती केली निवड करण्यात आलीले नवनियुक्त पदाधिकारी यांस सर्व पदाधिकारी. यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्य तर आभार प्रदर्शन अंबादास वाटोडे यांनी केले.

## गुहागर तालुक्यात सर्वाधिक १४६ मि मी पाऊस



रत्नागिरी : जिल्ह्यात गेल्या चोवीस तासात गुहागर तालुक्यात सर्वाधिक 146 मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात सरासरी 71.98 मि.मी. पाऊस झाला असून एकूण 647.80 मि.मी. पाऊस झाला आहे. तालुकानिहाय पावसाची आकडेवारी अनुक्रमे आजपर्यंत झालेली पुढीलप्रमाणे आहे. कंसातील आकडे आतापर्यंतच्या पावसाचे असून सर्व आकडे मिलीमीटर परिमाणात आहेत. मंडणगड- 68.40 (1202), दापोली- 118.90 (1381.50), खेड- 81.40 (1329.30), गुहागर-146 (1367.40), चिपळूण- 38 (1405.20), संगमेश्वर- 21.60 (1318), रत्नागिरी - 83 (1135.60), लांजा - 55.10 (1314), राजापूर- 35.40 (1259.60) असा पाऊस झाला आहे.

जिल्हा नियंत्रण कक्षाकडून ९ जुलै रोजी सकाळी १० वाजेपर्यंत प्राप्त झालेल्या अहवालानुसार जिल्ह्यात नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची प्राथमिक माहिती पुढीलप्रमाणे आहे.

दापोली तालुक्यात मौजे आडे आंजली ता. दापोली दहागाव येथे राष्ट्रीय महामार्ग १३८ वसाळ २६/१००, येथे रस्त्याची साईड पट्टी खचली आहे. वाहतुक सुरळीत सुरू आहे. मौजे वनौशी तर्फे पंचनदी येथील मराठी शाळेची संरक्षक भिंत पावसामुळे कोसळली आहे. मौजे आवासी येथील सावित्री शांताराम शेडगे यांच्या घराचे अतिवृष्टीमुळे 68 हजार 100 रूपयांचे, मौजे सारंग येथे सुनिता गणू बेंढारी यांच्या घराचे अंदाजे १५ हजार रुपयांचे मौजे शिरखल येथे बाळकृष्ण धानाजी देसाई यांच्या घराचे अंदाजे ८० हजार रुपयांचे, मौजे टाकसुरे येथील देविदास गणपत करमकर यांचे बाथरूमचे व इतर घराचे २ लाख ७३ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

ग्रामपंचायत करंजारी मुख्य रस्त्याचे अंदाजे १ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. मौजे करजाणी येथील नितीन सुरेश बारदुले यांच्या घरातील सामान वाहून गेल्याने अंदाजे ४० हजार रुपयांचे, मौजे करंजाणी येथील राजेंद्र हरिश्चंद्र पालेकर यांच्या अन्नधान्याचे ७ हजार ४०० रुपयांचे तर मौजे दापोली सारंग येथील जायदा रफिक भारदी यांच्या दुकानात पाणी शिरून अन्नधान्याचे ५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

खेड तालुक्यातील मौजे मांडवे येथे बाळकृष्ण रेवणे यांच्या घरावर नारळाचे झाड पडून अशंतः नुकसान झाले आहे. गुहागर तालुक्यात शहरातील ३ घरांमध्ये मध्ये पुराचे पाणी गेल्याने १० लोकांना तसेच ५ घरांमध्ये पाणी जाण्याची शक्यता असल्याने २३ लोकांना अशा एकूण ३३ लोकांना त्यांचे नातेवाईकांकडे स्थलांतरीत केले आहे.तसेच आरे या गावातील नदीकाठावरील २ घरांमध्ये पाणी गेल्याने ४ नागरिकांना स्थलांतरित करण्यात आले आहे. रत्नागिरी तालुक्यात मौजे कोतवडे येथील शशिकला शांताराम मयेकर यांचा गोठा पावसाने पुर्णतः कोसळून नुकसान झाले.

राजापूर तालुक्यात मौजे आंबोळगड येथील गगनगिरी मठावरील पत्रे उडून गेल्याने अंदाजे ५० हजार रूपयांचे, मौजे करक पुनर्वसन येथे शुभांगी नरेंद्र गांधी यांचे अतिवृष्टी मुळे घराचे अंशतः अंदाजे नुकसान ५५ हजार रुपयांचे तर मौजे जैतापूर येथे श्रीम. शिल्पा सुभाष मांजरेकर यांचे घराची भिंत पडून अंशत १० हजार रुपयांचे, मौजे - ताम्हाणे येथील संभाजी कानेटकर यांच्या घरावर झाड पडल्याने घराचे अंशतः अंदाजे ७ हजार रुपयांचे, मौजे मोसम येथे पांडुरंग सयाजी कोकरे यांच्या घराची संरक्षित भिंत पडल्याने ८ हजार रुपयांचे, मौजे केळवली येथील उर्मिला उदय कासार यांचे घरात पावसाचे पाणी शिरल्याने अंदाजे ८ हजार रुपयांचे तर मौजे कोंड्ये तर्फे सौंदळ येथील रमेश महादेव शिवगण यांच्या घराचे मुसळधार पावसाने अंदाजे १ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

## Waterlogged roads belie Pune Municipal Corporation's monsoon preparedness claims

Pune waterlogging Pune rainsFollowing complaints about storm-water drains, the civic administration had laid pipes and dug up footpaths to connect water outlets to storm-water drains to prevent waterlogging.

The Pune Municipal Corporation's (PMC) claims of having improved roads to prevent waterlogging during the monsoon have fallen flat and residents are accusing the administration of having a lacklustre approach to addressing their concerns.

When it rained on Monday evening, the civic administration's poor-quality road work was exposed, residents said. Morning walkers witnessed waterlogging on the road connecting the Mhatre bridge to the Rajaram bridge in Erandwane on Tuesday.

Following complaints about storm-water drains, the civic administration had laid pipes and dug up footpaths to connect water outlets to storm-water drains to prevent waterlogging.



However, water continued to be collected on the roads. In some places, chambers of storm-water drains were reconstructed in a way that they were above the surface of the road. So water got surrounded around the chambers instead of getting drained.

"The PMC administration had claimed that it had identified the waterlogging spots and done necessary improvement work. However, the work done on the road connecting the Mhatre bridge to the Rajaram bridge was of poor quality and this was pointed out to the civic administration. Last evening's rain exposed the work," said Vivek Velankar, a civic activist.

## वाहतूक पोलिसांनी बुजवले खड्डे



घाटकोपर - गेल्या दोन दिवसापासून मुंबई सह राज्यात पावसाने चांगलीच हजेरी लावून मुंबईचे तुंबईत रूपांतर केले. तर अनेक ठिकाणी रस्त्यावर खड्डे पडायला सुरुवात झाली आहे. घाटकोपर अंधेरी लिंक रोड , श्रेयस सिग्नल वर काही खड्डे पडल्याने वाहनांना वाहतूक करताना मोठा अडथळा निर्माण होत होता. यावेळी सिग्नल वर कार्यरत असलेल्या वाहतूक पोलिसांनी सिग्नल वरील खड्डे बुजवत वाहनाचा अडथळा दूर केला. रविवारी रात्रीपासून सुरू असलेल्या पावसाने मुंबईतील महत्त्वाच्या सेवा ठप्प केली. पाच ते सहा तासांत 300 मिलिमीटर चा पाऊस कोसळला त्यामुळे काही भागात पाणी साचले तर अनेक ठिकाणी झाडे कोसळले, भिंत पडल्या तर अनेक रस्त्यावर खड्डे पडल्याने वाहतुकीवर त्याचा परिणाम दिसून येत आहे. घाटकोपर पश्चिमेकडील श्रेयस सिग्नल रोड वर मोठे खड्डे पडल्याने वाहनाना अडथळा होत होता. आज सिग्नल वर कार्यरत असलेल्या तीन वाहतूक पोलिसांनी स्वतहा माती द्वारे खड्डे बुजवण्याचां प्रयत्न केला.

## Greater Noida builder ordered to compensate buyer for 3-year delay in handover, incomplete construction



Over a decade ago, in 2012, a homebuyer booked a flat for Rs 70 lakh at Panchsheel Greens in sector 16, Greater Noida. If things went as planned, the buyer would have got the flat by 2017, three years after the layout plan was approved. In 2021, they were asked by the builders to take possession of an incomplete house, which they refused.

The National Consumer Disputes Redressal Commission (NCDRC) recently directed Panchsheel Buildtech to compensate the homebuyer for the three-year (2017 to 2020) delay in the form of 6 per cent annual interest on their deposit. The commission further directed the builder to complete the construction and hand over the flat without any delay.

The builder said that due to a farmer agitation, the master plan was notified late, leading to a delay of two years from 2012 to 2014. Though it offered possession to the homebuyer in 2017, an occupation certificate was not yet issued, due to which the complainant refused to take possession. After a four year delay, the occupation certificate was issued and possession was offered to the buyer in 2021.

On being offered possession for the second time, Reena Rao, one of the complainants in this case, alleged that the house was not habitable. She complained that the entry gate was missing, the house was "totally raw" and that there was a lot of seepage in the house. It was also her complaint that woodwork, bathroom fittings, and kitchen work were incomplete and that the walls of the house were not aligned with one another.

The complainants also alleged that the price of the flat was increased from Rs 55.7 lakh to Rs 70 lakh allegedly following an Allahabad High Court order enhancing the compensation to be given to farmers in case of land acquisition.

## Relief for city as rainfall weakens; IMD issues yellow alert



Mumbai Rain, Mumbai Weather Forecast Live: In light of the subdued showers, the India Meteorological Department (IMD) has downgraded the red alert and now sounded a yellow alert in Mumbai which is slated to remain in place until Wednesday morning. The weather department has indicated that the city may witness heavy rainfall in isolated pockets today. While no warning has been issued in Mumbai for Wednesday, a yellow alert has been sounded again between Thursday and Saturday. Meanwhile, an orange alert has been issued in Raigad which will remain in place until Tomorrow morning. In Thane, a yellow alert has been issued which is slated to stay in place until the end of this week. In other news, revealing new details of the hit-and-run accident in which a woman was killed in Mumbai on Sunday morning, police told the court on Monday that the accused, Mihir Shah, who is alleged to have been driving the vehicle, switched seats with his driver "after dragging the woman on the bonnet for nearly one-and-a-half kilometres". The driver, Rajrishi Rajendrasingh Bidawat, then "reversed the vehicle and mowed (down the woman) for the second time before escaping," the police said, adding that this was done to "mislead" the investigation.

# पीएम आवास योजनेचा पहिला हप्ता मिळताच ११ विवाहित महिलांनी प्रियकरासह केला पोबारा




● उत्तर प्रदेश, (प्रतिनिधी) :

केंद्र सरकारकडून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना हक्काचं घर बांधता यावं यासाठी आर्थिक मदत केली जाते. पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना ठरवलेल्या मर्यादेनुसार आर्थिक मदत थेट बँक खात्यात हस्तांतरीत केली जाते. मात्र, याचा गैरफायदाही घेतला जात असल्याची अनेक प्रकरणं देशाच्या विविध भागात उघडकीस आली आहेत. असंच एक प्रकरण सध्या उत्तर प्रदेशात चर्चेचा विषय ठरलं आहे. जवळपास ११ विवाहित महिलांनी पीएम आवास योजनेचा पहिला हप्ता अशाच प्रकारे थेट बँक खात्यात वर्ग होताच आपल्या प्रियकरासोबत पोबारा केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हिंदुस्तान टाईम्सनं हे वृत्त दिलं आहे.


हा सगळा प्रकार उत्तर प्रदेशच्या महाराजगंज जिल्ह्यात घडला आहे. जिल्ह्यातल्या थुथीबारी, शीतलापूर, चतिया, सामनगर, बकुल दिहा, खासरा, किशनपूर आणि मेधौली या गावांमधील एकूण ११ पुरुषांनी स्थानिक पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली. त्यांच्या पत्नी प्रियकरासोबत पळून गेल्याच्या या तक्रारी होत्या. या सगळ्या तक्रारी एकच प्रकारच्या कशा? असा पोलिसांना संशय आल्यामुळे त्यांनी त्यावर तपास सुरू केला. यासंदर्भात चौकशी केल्यानंतर पोलिसांना खरा प्रकार समजला. या गावांमध्ये नुकतंच २३५० लाभार्थ्यांच्या बँक खात्यांमध्ये थेट पंतप्रधान आवास योजनेचा पहिला हप्ता हस्तांतरीत करण्यात आला होता. त्यातच संबधित ११ महिलांचा समावेश होता.

### ११ महिला प्रियकरासोबत फरार

लाभार्थ्यांपैकी ११ महिला लाभार्थी योजनेच्या पहिल्या हप्त्याचे ४० हजार रुपये खात्यात हस्तांतरीत होताच त्यांच्या प्रियकरासोबत फरार झाल्याची बाब पोलिसांना समजली. त्यामुळे प्रशासनाने या लाभार्थ्यांचा पुढचा हप्ता रोखण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिले आहेत. पंतप्रधान आवास योजनेमध्ये पक्कं घर बांधण्यासाठी लाभार्थ्यांना सुमारे अडीच लाखांचं अनुदान दिलं जातं. लाभार्थी कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नावर अनुदानाची मर्यादा अवलंबून असते. या प्रक्रियेत काही गैरप्रकार आढळून आल्यास हा पैसा सरकारला परत देण्याचे आदेशही दिले जाऊ शकतात, अशी तरतूद करण्यात आली आहे.

# कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या दोन वर्षांतील महत्वपूर्ण निर्णयांच्या माहिती पुस्तिकेचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन

● मुंबई, प्रतिनिधी :



कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागामार्फत गेल्या दोन वर्षात राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांची व योजनांच्या 'कौशल्ययुक्त महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र' माहिती पुस्तिकेचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी मंत्रिमंडळातील सर्व मंत्रीगण उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, देशाचा विकास गतीने होण्यासाठी प्रत्येक क्षेत्रात अनुभवी, कार्यक्षम, सर्जनशील कुशल मनुष्यबळाची अत्यंत आवश्यकता आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी युवा पिढीला कौशल्ययुक्त बनवण्यासाठी कौशल्य विकासाच्या उपक्रमांना प्राधान्य दिले आहे. कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून विभागातील सर्व अधिकारी यांना सोबत घेवून सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करून रोजगार निर्मितीसाठी प्रभावी अंमलबजावणी केली याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिर, आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र, कौशल्य विद्यापीठाची स्थापना, स्वामी विवेकानंद आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास प्रबोधिनी, ग्रामीण भागात 511 प्रमोद महाजन ग्रामीण व कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यात आली आहेत. यासह पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा व नमो महारोजगार मिळावे असे विविध उपक्रम विभागाच्या माध्यमातून राबविण्यात आले आहेत. राज्यातील युवकांना जास्तीत जास्त रोजगार निर्माण होवून राज्याच्या विकासाला गती मिळेल असेही ते म्हणाले.

# बारामतीत १४ जुलैला राष्ट्रवादी काँग्रेसची अभूतपूर्व जाहीर सभा - सुनिल तटकरे



● मुंबई, (प्रतिनिधी):

आजच्या बैठकीत दिनांक १४ जुलै रोजी दुपारी १ वाजता बारामती येथे अभूतपूर्व अशी जाहीर सभा घेण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी बैठकीनंतर माध्यमांना दिली.

या जाहीर सभेत मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना,तीन गॅस सिलेंडर मोफत देण्याची योजना, शेतकऱ्यांच्या वीज माफीची योजना, तरुण - तरुणींना दहा हजार रुपये स्टायपेंड देण्याची योजना, सोयाबीन व कापूस उत्पादकांना पाच हजार रुपये देण्याचा निर्णय असेल, ई-पिंक रिक्षा, अशा ज्या वेगवेगळ्या योजना सरकारने जाहीर केल्या आहेत त्या राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मार्फत जनतेपर्यंत पोचवण्यासाठी आमचा प्रयत्न राहणार आहे. यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात वेगवेगळे कार्यक्रम घेण्यात येणार आहेत असेही सुनिल तटकरे यांनी सांगितले. मागील आठवड्यात पक्षाच्या विविध सेल, जिल्हाध्यक्ष व इतर पदाधिकारी यांची दोन दिवस मॅरेथॉन बैठका घेतल्या. या बैठकीत आगामी विधानसभा निवडणूकीला सामोरे जाण्यासंदर्भात जनतेचे मत काय आहे हे जाणून घेतले. महायुती सरकारचा अर्थसंकल्प अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी मांडला. या अर्थसंकल्पाचे मोठया प्रमाणात स्वागत करण्यात आल्याचेही सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केले.

# आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने न्यायदान प्रक्रिया गतिमान करण्याचा प्रयत्न प्रशंसनीय - मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय

● मुंबई, (प्रतिनिधी):



महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण न्यायदान प्रक्रिया गतिमान करण्याचा प्रयत्न करीत आहे. न्याय व्यवस्थेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केल्यास गतिमानता येते, हे न्यायाधिकरणाने दाखवून दिले आहे. न्यायदानात आधुनिक तंत्रज्ञान उपयोगात आणून ही प्रक्रिया गतिमान करण्याचा न्यायाधिकरणाचा प्रयत्न निश्चितच प्रशंसनीय आहे, असे गौरवोद्गार मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय यांनी आज काढले.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या 33 व्या स्थापना दिवसानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन न्यायाधिकरणाच्या सभागृहात करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर न्यायाधिकरणाच्या अध्यक्ष न्या. मृदुला भाटकर उपस्थित होत्या, तर मुख्य सचिव सुजाता सौनिक, राज्याचे महाधिवक्ता वीरेंद्र सराफ, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष रजनीश शेठ, 'महारेरा'चे अध्यक्ष न्या. संभाजी शिंदे, अपर मुख्य सचिव (सेवा) नितीन गद्रे, उपाध्यक्ष न्या. पी आर बोरा, सदस्य देवाशिष चक्रवर्ती, मेधा गाडगीळ, रजिस्टार श्रीमती पी.एस झाडकर, विशेष कार्य अधिकारी सुरेश जोशी उपस्थित होते.

मुख्य न्यायमूर्ती श्री. उपाध्याय म्हणाले की, प्रशासकीय सेवेमध्ये नागरिकांप्रती जबाबदारीने काम करावे लागते. सेवा देताना पदोन्नती, बदली, नियुक्ती, निवृत्ती आदी प्रकरणांमध्ये न्यायाधिकरण महत्त्वाची भूमिका बजावते. सेवेतील अनेक प्रकरणांमध्ये न्यायाधिकरणाने दिलेले निकाल पथदर्शी ठरतात. सेवाविषयक 95 टक्के प्रकरणांमध्ये न्यायाधिकरण न्याय देत आहे. त्यामुळे निश्चितच पारंपरिक न्यायव्यवस्थेवरील दबाव कमी होत आहे.

■ महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामार्फत ई- मॅट नावाने मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. त्यावर न्यायिक प्रकरणांची सद्य:स्थिती, आदेश व न्याय निर्णय यांची माहिती मिळते. तसेच न्यायाधिकरणामार्फत लवकरच न्याय निर्णय व आदेशांचे भाषांतर मराठीमध्ये करण्याकरिता 'सुवास ॲप' सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती यावेळी अध्यक्ष न्या. भाटकर यांनी दिली.

■ कार्यक्रमादरम्यान सेवा विषयक कायदे, न्यायाधिकरणाची माहिती, सुविधा विषयक पुस्तिकेचे मुख्य न्यायमूर्ती श्री. उपाध्याय यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. विधीज्ञ वैशाली जगदाळे व पूर्वा प्रधान यांचा न्यायाधिकरणातील अनुभव आधारित संवाद देखील सादर करण्यात आला. विधीज्ञ एम.डी लोणकर, पूनम महाजन यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन विशेष कार्य अधिकारी श्री. जोशी यांनी केले, तर आभार रजिस्ट्रार श्रीमती झाडकर यांनी मानले. कार्यक्रमाला न्यायाधीश, विधीज्ञ, न्यायाधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# मुंबईतील रेल्वे स्थानकांची नावे बदलण्याचा ठराव विधानपरिषदेत संमत



● मुंबई, (प्रतिनिधी):

विधानपरिषदेत सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे यांनी मुंबईतील रेल्वे स्थानकांची नावे बदलण्याचा ठराव मांडला. मध्य रेल्वे मार्गावरील करी रोड रेल्वे स्थानकाचे नाव बदलून लालबाग रेल्वे स्थानक, सॅंडहॅर्स्ट रोड रेल्वे स्थानकाचे नाव बदलून डोंगरी रेल्वे स्थानक, पश्चिम मार्गावरील मरीन लाईन्स रेल्वे स्थानकाचे नाव बदलून मुंबा देवी रेल्वे स्थानक, चर्नी रोड रेल्वे स्थानकाचे नाव बदलून गिरगाव रेल्वे स्थानक, हार्बर रेल्वे मार्गावरील कॉटन ग्रीन चे काळी चौकी रेल्वे स्थानक, डॉक यार्ड रेल्वे स्थानकाचे नाव बदलून माझगाव रेल्वे स्थानक, किंग्ज सर्कल स्थानकाचे नाव तिर्थंकर पार्श्वनाथ रेल्वे स्थानक याप्रमाणे बदलण्यात यावेत, अशी शिफारस महाराष्ट्र विधानपरिषद केंद्र शासनास करीत आहे, असा ठराव संमत करण्यात आला.

# बेस्टच्या भंगार बस विक्री गैरव्यवहार प्रकरणाची उच्चस्तरीय समितीद्वारे चौकशी – मंत्री उदय सामंत



● मुंबई, (प्रतिनिधी):

मुंबईतील बेस्टच्या भंगार बस विक्रीप्रकरणी गैरव्यवहाराच्या आरोपांसंदर्भात उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्यात येईल, अशी माहिती, मंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत दिली. सदस्य लहू कानडे यांनी यासंदर्भात प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान प्रश्न उपस्थित केला होता. मंत्री श्री. सामंत म्हणाले, बेस्टच्या भंगार बस आणि भंगार माल विक्रीबाबत ई लिलाव पद्धत अवलंबली जाते. तरीही, याबाबतचे आक्षेप लक्षात घेत याप्रकरणी उच्च स्तरीय समिती नेमण्यात येईल. यावेळी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, सदस्य ॲड. आशिष शेलार, अनिल देशमुख, बाळासाहेब पाटील, नितेश राणे यांनी चर्चेत भाग घेतला.

# टेली कॉल सेंटर कडून महिलेला अश्लील भाषेत शिवीगाळ, खंडणी विरोधी पथकाने केली कारवाई

● ठाणे, (प्रतिनिधी):



खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहराने मोबाईल ॲपद्वारे कर्ज घेतलेल्या व्यक्तींना आणि त्यांच्या नातेवाईकांना त्रास देणाऱ्या टेली कॉल सेंटरचा पर्दाफाश केला आहे. तसेच, ग्राहकांच्या नावाने सिमकार्ड काढून फसवणूक करणाऱ्या व्ही.आय. कंपनीच्या प्रतिनिधीला अटक करण्यात आली आहे.

चितळसर मानपाडा पोलीस स्टेशनमध्ये दाखल गुन्हा रजि. नंबर 632/2024 भादवि कलम 504, 506, 509, 420, 34 प्रमाणे दिनांक 02/07/2024 रोजी दाखल करण्यात आला होता. फिर्यादीला विविध मोबाइल नंबरवरून कॉल करून आर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली जात होती तसेच अश्लील भाषेत बोलून त्यांना त्रास दिला जात होता. तांत्रिक विश्लेषणाद्वारे, आरोपी मंगेश हरेश सुतारे (वय 34 वर्षे, धंदा मासेमारी, अंधेरी, मुंबई) याला बोलावून त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने मोबाइल नंबर कधीही घेतले नसल्याचे सांगितले. याप्रकरणी वायरलेस कनेक्ट, मिनी स्टोअर्स, अंधेरी पश्चिम येथील व्हीआय कंपनीचा प्रतिनिधी राहुलकुमार टिळकधारी दुबे (वय 33 वर्षे, रा. विरार) याला चौकशी केली असता त्याने ग्राहकांच्या नावाने सिमकार्ड काढून टेली कॉल सेंटरला दिल्याचे सांगितले.

त्यानुसार, लोन रिकव्हरी टेली कॉल सेंटर सिटीझन कॅपीटल (भायंदर) येथे छापा टाकून कॉलसेंटरचे मालक शुभम कालीचरण ओझा (वय 29 वर्षे, मिरा रोड) आणि टेलीकॉलर अमित मंगला पाठक (वय 33 वर्षे, मालाड पश्चिम, मुंबई) यांना अटक करण्यात आली आहे. या आरोपींनी फिर्यादीला कोणतेही कर्ज घेतले नसतानाही त्रास दिला. आरोपींकडून कॉम्प्युटरमधील 4 एस.एस.डी. हार्डडिस्क, 1 जीएसएम गेटवे, 1 टीपी लिंक कंपनीचा 24 पोर्ट स्विच, 1 राऊटर, 3 मोबाईल असा एकूण 77,300/- रुपये किमतीचा माल हस्तगत केला आहे.

# इतर पक्षात सन्मान नाही', वसंत मोरेंचा पक्षप्रवेश होताच उद्धव ठाकरेंची मनसेवर टीका

● मुंबई, (प्रतिनिधी):



मनसेचे फायरब्रँड नेते वसंत मोरे यांनी लोकसभा निवडणुकीपूर्वी मनसेला सोडचिठ्ठी दिली होती. तसेच वंचित बहुजन आघाडीच्या तिकीटावर त्यांनी लोकसभा निवडणूक लढविली. मात्र त्यानंतर आता त्यांनी शिवसेना उबाठा गटात प्रवेश घेतला आहे. उद्धव ठाकरे यांनी वसंत मोरे यांच्या हातावर शिवबंधन बांधत त्यांचे स्वागत केले आणि मनसेवर अप्रत्यक्षपणे टीका केली. यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले, "शिवसेनेत स्वगृही परतलेल्या सर्व बांधवाचे स्वागत करतो. लोकसभा निवडणुकीच्या आधी वसंतराव काय करताय याकडे सर्वांचे लक्ष होते. काय करायचे हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न असतो. वसंत मोरे आधी शिवसैनिक होते. मधल्या काळात ते दुसऱ्या पक्षात गेले. इतर पक्षात सन्मान मिळतो का? काय वागणूक दिली जाते? याचा अनुभव घेऊन अधिक परिपक्व होत आता ते स्वगृही परतले आहेत."

शिवसेना सोडल्याबद्दल तुम्हाला शिक्षा झाली पाहीजे, असे उद्धव ठाकरे यांनी सांगताच पक्षप्रवेश करणाऱ्यांमध्ये हशा पिकला. पूर्वीपेक्षा अधिक पटीने पुण्यात शिवसेना वाढली पाहीजे, अशी जबाबदारी उद्धव ठाकरे यांनी वसंत मोरेंना दिली. उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, इतर पक्षातील अनुभव गाठीशी असल्यामुळे आज तुमचे महत्त्व, काम आणि जबाबदारी फार मोठी आहे. वसंत मोरे यांच्यासह मनसेचे १७ शाखाध्यक्ष आणि पाच विभाग अध्यक्ष उबाठा गटात आले आहेत.

# हाथरस'प्रकरणी SIT च्या अहवालानंतर योगी आदित्यनाथ ॲक्शन मोडवर, सहा अधिकारी निलंबित



● उत्तर प्रदेश , (प्रतिनिधी):

उत्तर प्रदेशमधील हाथरस येथे स्वयंघोषित धर्मगुरू भोले बाबाच्या सत्संगात झालेल्या चेंगराचेंगरीत १२१ जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेनंतर देशभरातून या सत्संगाचं आयोजन करणारे लोक आणि भोले बाबाविरोधात संतापाची लाट उसळली. त्यानंतर न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेत एसआयटी चौकशी करण्याचे आदेश दिले होते. एसयाटीच्या पथकाने तीन दिवसांचा तपास आणि तब्बल १२० हून अधिक लोकांच्या चौकशा केल्यानंतर एसआयटीने ३०० पानांचा अहवाल सादर केला आहे. या अहवालात दुर्घटनेची कारणं आणि दुर्घटनेला जबाबदार असलेल्या लोकांची नावं नमूद करण्यात आली आहेत. हा अहवाल हाती पडताच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ ॲक्शन मोडवर आहेत. उत्तर प्रदेश सरकारने उपविभागीय दंडाधिकाऱ्यांसह सहा अधिकाऱ्यांना निलंबित केलं आहे. सर्कल ऑफिसरसह, सिकंदरामाऊच्या तहसीलदारांचाही या निलंबित अधिकाऱ्यांमध्ये समावेश आहे.

# लाडकी बहिण योजनेवरुन शरद पवारांचा अजितदादांना टोला

● सातारा, (प्रतिनिधी):



घरातील लाडक्या बहिणीकडे दुर्लक्ष करायचे आणि बाहेरच्या बहिणींना निधी द्यायचा, या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या धोरणाचा आगामी निवडणुकीत फायदा होईल का? असा सवाल पत्रकारांनी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांना साताऱ्यातील पत्रकार परिषदेत विचारला होता. या प्रश्नाचे उत्तर देताना शरद पवारांनी अजित पवारांना टोला लगावलाय. "कुठल्या का होईना बहिणींना द्या", असं शरद पवारांनी म्हटलं आहे. शरद पवार म्हणाले, नरेंद्र मोदी यांचा देश चुकीच्या दिशेने घेऊन जाण्याचा प्रयत्न जनतेनं हाणून पाडला. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत देखील अशाच पद्धतीने जनता निर्णय घेईल. आम्हाला लोकसभेला तुतारी आणि पिपाणी यामुळे फटका बसला. सातारा लोकसभा मतदारसंघात देखील आम्हाला फटका बसला आहे. आमचं चिन्ह तुतारी वाजवणारा माणूस हे आहे. आम्ही स्थापन केलेला पक्ष आणि चिन्ह वेगळी भूमिका घेतलेल्या लोकांना दिला. हे सगळं प्रकरण कोर्टात आहे, पुढील आठवड्यात त्याची सुनावणी आहे. स्वखुशीने देणगी स्वीकारण्याचा दिलेला निर्णय आमच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा आहे, असंही शरद पवार यांनी स्पष्ट केलं. इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांच्या वाघनखाबाबतच्या वक्तव्याबाबत बोलताना शरद पवार म्हणाले, इंद्रजीत सावंत यांच्या इतिहासातील कामाची मला कल्पना आहे. इतिहासामध्ये त्यांचा अभ्यास आहे, योगदान आहे. मी काही इतिहासाचा जाणकार नाही. मात्र यातील जाणकारांचं मत एकदम दुर्लक्षित करू नये, असंही शरद पवारांनी सांगितलं.

महात्मा फुले, शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी काम केलं. शाहू महाराज यांनी सर्वसामान्य गरिबांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. परराज्यात देखील आपल्या राज्यातील मान्यवरांची नाव जिल्ह्यांना दिली आहेत. पर्यावरणाची चर्चा केली जाते मात्र पर्यावरणाचा समतोल रहावा यासाठी आदिवासी समाज खऱ्या अर्थाने काम करतो.

# दादर रेल्वे स्थानकाचे नाव बदलून चैत्यभूमी करा - डॉ. नितीन राऊत



● मुंबई, (प्रतिनिधी):

राज्य सरकारने मुंबईतील अनेक रेल्वे स्थानकाचे नावे बदलविण्याची विनंती केंद्र सरकारकडे केली आहे. त्याच धर्तीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कोट्यवधी अनुयायांच्या मागणीनुसार दादर स्थानकाचं नामांतर 'चैत्यभूमी' करावे व यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याची मागणी काँग्रेसचे जेष्ठ नेते व राज्याचे माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी आज सभागृहात केली. २०१८ मध्ये राज्य सरकारने एल्फिन्स्टन रोड स्थानकाचं नाव बदलून प्रभादेवी केलं. ओशिवारा येथे रेल्वे स्थानक बनत असतानाच त्याला राम मंदिर असं नाव दिलं. दादर स्थानकाचं नाव बदलून चैत्यभूमी करावं, ही भीमसैनिकांची मागणी खूप जुनी आहे. त्यामुळे राज्य सरकारने जनभावनेचा आदर करत आता दादरचं नाव चैत्यभूमी करावं, अशी आग्रही मागणी डॉ. राऊत यांनी आज सभागृहात केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्यात दादरला अनन्यसाधारण महत्त्व आहे. दादरलाच राजगृहात ते राहायचे आणि महापरिनिर्वाणानंतर बाबासाहेबांचे अंतिम विधी येथेच झाले. त्यामुळे राज्यातल्याच नाही, तर देशातल्या आणि जगातल्या भीम अनुयायांच्या भावना दादरशी जोडल्या गेल्या आहेत. दरवर्षी लाखोंच्या संख्येने भीम अनुयायी महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमीवर येतात.